# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

**तारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०१८ / फाल्गुन ८, १९३९ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **गृहनिर्माण मंत्री** | |
| **(३)** | **कामगार, कौशल्य विकास, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिकांचे कल्याण मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४८**

---

### मुंबईतील लालबाग उड्डाणपुलाचे सिंप्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने केलेल्या बांधकामाबाबत

**(१) * १०४९०३ श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील लालबाग उड्डाणपुलाचे बांधकाम सदोष केल्याचे आढळल्याने सिंप्लेक्स इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीकडून बांधकामात हलगर्जीपणा झाला काय याची चौकशी करा व तसे आढळल्यास संबंधीत कंपनी विरोधात कायदेशीर कारवाई करा असा स्पष्ट आदेश मा.उच्च न्यायालयाने मुंबई महानगरपालिकेला दिनांक ५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमएमआरडीएने मेट्रो-२ बी या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याच्या कामासाठी याच कंपनीची निवड केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.न्यायालयाच्या आदेशानुसार मुंबई महानगरपालिकेने लालबाग उड्डाणपुलाचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेतल्यानंतर बांधकामातील अनेक त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, त्यामुळे स्ट्रक्चरल डिझाईनचा फेरआढावा घेण्याबरोबर अन्य दुरुस्त्या तातडीने करुन त्याबाबतचा अहवाल माहे जानेवारी, २०१८ अखेर मा. उच्च न्यायालयास सादर करणेबाबत निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, एमएमआरडीएने स्वत:च्या अखत्यारित सदर पुलाचे बांधकाम सिम्प्लेक्स या कंपनीकडून करुन घेऊन नंतर हा पुल मुंबई महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केला, त्याच सिम्प्लेक्स कंपनीला मेट्रो-२ बी प्रकल्पाच्या पहिल्या टप्याचे काम देण्याचा निर्णय घेणाऱ्या संबंधीत दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) अद्याप कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत, तसेच सदर निर्णय घेत असताना निविदा तसेच अन्य पध्दतींचा अवलंब करण्यात आला होता काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) जनहित याचिका क्रमांक (एल) १२६/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक २३.०३.२०१७ आदेशान्वये "उड्डाणपूलाचे बांधकाम करताना कंत्राटदाराने हलगर्जीपणा केला आहे का हे निश्चित करावे, जर असा हलगर्जीपणा झाला असेल तर कंत्राटदारावर कारवाई करावी" असे बृहन्मुंबई महानगरपालिकेस निर्देश दिलेले आहेत.
(२) मेट्रो २ब प्रकल्पाच्या भाग क्र. सी. ए. ०४ आर या कामासाठी ई-निविदा पद्धतीने मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. या कंपनीस विहित पध्दती अवलंबून निविदा स्वीकृती पत्र देण्यात आले आहे.
(३) जनहित याचिका क्रमांक (एल) १२६/२०१६ मधील मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामध्ये "सदर पुलाच्या स्ट्रक्चरल दुरुस्ती बाबत स्वतंत्रपणे निविदा मागवून आय. आय. टी. पवई सारख्या सक्षम संस्थेच्या देखरेखीखाली दिनांक २८.०२.२०१९ पर्यंत करण्यात यावी," असे बृहन्मुंबई महानगरपालिकेस निर्देश देण्यात आले आहेत.
(४) व (५) मुंबई मेट्रो मार्ग-२ब मेट्रो मार्गाच्या पॅकेज क्र. ०४ आर च्या उन्नत मार्ग व ११ स्थानकांच्या स्थापत्य बांधकामाकरीता ई-निविदा प्राधिकरणाकडून

मागविण्यात आल्यानंतर आठ निविदा प्राप्त झाल्या. निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती नुसार पात्रतेचे सर्व निकष पूर्ण केलेल्या या सर्व पात्र आठ कंपन्यांपैकी मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांनी सादर केलेला देकार लघुत्तम असल्याने, निविदा प्रक्रियेच्या विहित पध्दतीनुसार पॅकेज-०४ आर साठी मे. सिंप्लेक्स इंफ्रा. लि. यांच्या लघुत्तम देकारास मुंबई महानगर प्रदेश विकास प्रधिकरणाने मंजुरी दिली आहे.

-----------------

## कडेगाव (जि.सांगली) तालुक्यातील वांगी व शिरगाव सिमेवर झालेल्या अपघातात ६ जणांचा झालेला मृत्यू

**(२) * १०४७८२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कडेगाव (जि.सांगली) तालुक्यातील वांगी व शिरगाव सिमेवर दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास क्रुझर व ट्रॅक्टर यांच्यात झालेल्या भिषण अपघातात ६ पैलवानांचा जागीच मृत्यू तर, ८ जण गंभीररित्या जखमी झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा.परिवहन मंत्री यांना दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास पत्र पाठवून कार्यवाहीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच मृत व जखमी व्यक्तींना अर्थसहाय्य करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर घटना दिनांक १२.०१.२०१८ रोजी सुमारे २२.३० चे सुमारास घडली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) दिनांक १२.०१.२०१८ रोजी २२.३० चे सुमारास वांगी ते सांगली या मार्गावर रस्त्याच्या विरुध्द दिशेला जाऊन समोरुन येणाऱ्या क्रुझर गाडीला ट्रॅक्टरच्या पाठीमागील मोठ्या चाकाची जोराने धडक बसल्याने झालेल्या गंभीर अपघातामध्ये क्रुझर गाडीच्या चालकासह गाडीमधील ६ जण मयत झाले तर ८ जण जखमी झाले आहेत. ट्रॅक्टरचालक सदर अपघातास कारणीभूत होऊन अपघाताची खबर न देता तसेच जखमींना मदत न करता पळून गेला.

याप्रकरणी चिंचणी वांगी पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६/२०१८ भा.दं.वि. कलम २७९, ३०४(II), ३३७, ३३८, ४२७ सह मो.वा.का. कलम १८४, १३४(अ)(ब)/१८७ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. आरोपी ट्रॅक्टरचालक यास दिनांक १३.०१.२०१८ रोजी अटक करण्यांत आली असून त्यास दिनांक १५.०१.२०१८ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड व त्यानंतर न्यायालयीन कस्टडी देण्यांत आली आहे. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

मृत व्यक्तींच्या वारसांना अर्थसहाय्य देण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कांजूरमार्ग येथील सिनेविस्टा स्टुडिओला लागलेल्या आगीत एका व्यक्तीचा झालेला मृत्यू

**(३) * १०७८६४ श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कांजूरमार्ग येथील सिनेविस्टा स्टुडिओला दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास आग लागून एका व्यक्तीचा मृत्यु झाला तसेच या आगीत लाखो रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिनेविस्टा स्टुडिओला लागलेल्या आगीसंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुषंगाने पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(३) तसेच, गत १५ दिवसांमध्ये मुंबई शहरात घडलेली ही आगीची पाचवी घटना असल्यामुळे अशा आगींना प्रतिबंधीत करण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

मात्र सदर घटना ही दिनांक ०६.०१.२०१८ रोजी घडली आहे. या आगीमध्ये तेथील एका कामगाराचा जळून मृत्यु झालेला आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत आगीची चौकशी करण्यांत आली असून सदर आग ही सदोष विद्युत प्रणालीमुळे विद्युत केबलच्या ठिणग्या जवळपासच्या ज्वलनशील पदार्थांच्या संपर्कात आल्यामुळे लागलेली आहे.

सदर दुर्घटनेबाबत पार्कसाईट पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ७७/२०१८, भा.दं.वि. कलम ३०४(अ), ३४ प्रमाणे दिनांक १०.०२.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. आग नियंत्रित ठेवण्याची यंत्रणा अद्ययावत व सुस्थितीत न ठेवून निष्काळजी व बेजबाबदारपणा केल्याने व एका कामगाराच्या मृत्युस कारणीभूत झाल्याने स्टुडिओचे मालक / पार्टनर अशा तीन आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करण्यांत आला असून आरोपीस दिनांक १३.०२.२०१८ रोजी अटक करुन आरोपीची जामीनावर सुटका झाली आहे.
(३) मुंबई अग्निशमन दलामार्फत अग्निसुरक्षा पालन कक्षाची स्थापना करण्यांत आली असून त्यामार्फत कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पवई येथील मौजे पासपोली व तुंगवा येथे औद्योगिक वापराच्या जमिनीवर बेकायदा निवासी बांधकाम केल्याबाबत

**(४) * १०५११४ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई (पूर्व) उपनगर पवई येथील, मौजे पासपोली सर्व्हे नं. ८, ४१, ४८, न.भू.क्र. ८६, ८७, ११२, ११५ मौजे - तुंगवा येथील, सर्व्हे नं. ४१, ५०, ५२, ११५,११७, 'ए' व 'बी' सदर भूखंड युएलसी अधिनियम १९७६ चे कलम २० अंतर्गत, शासनाने औद्योगिक वापरासाठी दिलेल्या जमीनीचे, 'एल ॲण्ड टी कंपनी' व्यवस्थापनाने बेकायदा निवासी मध्ये रुपांतर करुन, त्यावर २२ मजली, १० निवासी टॉवर इमारतीचे अनधिकृत बांधकाम करुन गैरव्यवहार केल्या प्रकरणाची दोन महिन्यात उच्च स्तरीय चौकशी करण्याचे आदेश मा. राज्यमंत्री महोदयांनी, दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी देऊनही, अद्याप शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्यास शासनास लागत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार बांधकामास तात्काळ स्थगिती देवून दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मे. लार्सन ॲण्ड टुब्रो यांच्या मौजे-पासपोली येथील सर्वे क्र.८ पै (सि.टी.एस.नं. ८६, ८७), मौजे-तुंगवा येथील सर्वे क्र. ४१ पै, ४८ पै (सि.टी.एस. नं. ११५), सर्वे नं. ५० पै, ५२ पै (सि.टी.एस.नं.११७), मौजे-एरंगळ येथील सर्वे क्र. १३७ पै, १४५ पै (सि.टी.एस.नं.२०४१, २१४३, २१४३/१ ते ४, २१५७, २१५८, २१५८/१ ते ४) मधील एकूण ४,७९,८५६.०० चौ.मी. क्षेत्राला औद्योगिक प्रयोजनार्थ दि.३१/०३/१९७८ व दि.२५/०४/१९७८ च्या आदेशानुसार सूट देण्यात आली होती. सदर सूटीखालील क्षेत्राबाबत विधानमंडळात देण्यात आलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समुह यांनी दि.२३/१०/२०१७ व आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी दि.०५/१२/२०१७ च्या पत्रानुसार अहवाल सादर केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासनास प्राप्त झालेल्या सदर अहवालांची तपासणी करुन, शासन निर्णय दि.२३/११/२००७ मधील तरतूदीनुसार निश्चित करण्यात आलेले शासन अधिमुल्य वसुल करणे, तसेच महानगरपालिकेकडील संबंधित

जबाबदार अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाही करणे तसेच मे. लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीने नाजकधा अधिनियमातील तरतूदीचा भंग केला असल्याने त्यांच्या विरुध्द कार्यवाही करण्याचे निदेश आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, बृहन्मुंबई नागरी समुह यांना दि.१६/२/२०१८ रोजी देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद महानगरपालिकेतील उपायुक्त व कनिष्ठ लिपीक यांना लाच घेतांना केलेली अटक

**(५) * १०७३४३ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महानगरपालिकेचे उपायुक्त श्री.अय्युब खान नूरखान पठाण व कनिष्ठ लिपीक दादाराव रखमाजी लाहोटी या दोघांना तीन लाख रुपयांची लाच स्विकारताना महानगरपालिका मुख्यालयाच्या आवारात लाचलुचपत प्रतीबंधक विभागाने (एसीबी) अटक केल्याची बाब दिनांक २६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद महानगरपालिकेचे उपायुक्त व कनिष्ठ लिपीक यांचे घर व अन्य ठिकाणची एसीबी ने तपासणी करून ज्ञात स्त्रोतापेक्षा जास्त संपत्ती जमवली आहे किंवा नाही याची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाचा तपास पूर्ण झाला आहे काय,

(४) असल्यास, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संबंधीत दोषींविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

आरोपी लोकसेवक श्री. अय्युब खान नुरखान पठाण, स्थानिक कर संस्था अधिकारी तथा प्रभारी उपायुक्त, औरंगाबाद महापालीका यांनी तक्रारदार यांचा महापालिकेत कायमस्वरुपी नियुक्तीबाबतचा प्रस्ताव महापालिकेच्या

सर्वसाधारण सभेत ठेवण्यासाठी, वरीष्ठ लिपिकाकरवी लाचेची मागणी करुन त्यांच्यामार्फत दि.२६.१०.२०१७ रोजी रु. १ लाख इतकी लाचेची रक्कम स्विकारल्यामुळे त्यांना अटक करण्यात आली. त्यानुसार आरोपी लोकसेवक श्री. अय्युब खान नूरखान पठाण व श्री. दादाराव लाहोटी, वरीष्ठ लिपिक यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमातील कलम ७,१२,१३ (१) (ड.) सह १३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) व (३) सदर प्रकरणाची चौकशी चालु आहे.

(४) व (५) श्री. अय्युब खान नूरखान पठाण, स्थानिक कर संस्था अधिकारी तथा प्रभारी उपायुक्त यांना दि.१.११.२०१७ व श्री. दादाराव लाहोटी, वरीष्ठ लिपीक दि.२७.१०.२०१७ रोजीच्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले आहे.

-----------------

## तिर्थक्षेत्र पंढरपूर (जि.सोलापूर) या शहराच्या सुरक्षिततेसाठीचा सी.सी.टी.व्ही. प्रकल्प प्रलंबित असल्याबाबत

**(६) * १०९७२० श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील तिर्थक्षेत्र पंढरपूर या शहराची सुरक्षा करणेबाबत तयार करण्यात आलेला सन २००८ चा सी.सी.टी.व्ही. प्रकल्पाचा खर्च रूपये ५ कोटी वरून सुमारे रूपये ५६ कोटीपर्यंत पोहचला असून सदर प्रकल्प प्रलंबित असल्याचे दिनांक १४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देशात व राज्यात घडणाऱ्या दहशतवादी कारवाया लक्षात घेऊन तत्कालीन राज्य शासनाने शहराच्या सुरक्षेवर नजर ठेवणेसाठी राज्यातील कोट्यवधी भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या पंढरपूर तिर्थक्षेत्राच्या सुरक्षिततेसाठी असणारा सुधारित सी.सी.टी.व्ही. आराखडा रूपये ५ कोटी वरून सुमारे रूपये ५६ कोटींवर जाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, पंढरपूर शहरातील सी.सी.टी.व्ही. बसविण्याचा रूपये ५६ कोटींचा प्रस्ताव संबंधित जिल्हा प्रशासन यांनी गृह विभाग मंत्रालय, यांचेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) पोलीस अधीक्षक, सोलापूर (ग्रामीण) यांनी शासन नियुक्त तांत्रिक सल्लागार मे.के.पी.एम.जी. यांच्या सहाय्याने संपूर्ण पंढरपूर शहराच्या सुरक्षेसाठी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व इतर स्मार्ट सिटी घटकांचा समावेश करुन एकत्रित रुपये ५६ कोटी एवढ्या रक्कमेचा तपशीलवार प्रकल्प अहवाल (DPR) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे दिनांक ०५.०८.२०१७ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.
(२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार संपूर्ण पंढरपूर शहरात एकूण १७५ सी.सी.टी.व्ही. कॅमेरे,१०८ ठिकाणी सार्वजनिक उदघोषणा प्रणाली (Public Address System), एक आदेश व नियंत्रण कक्ष आणि एक डेटा सेंटर इत्यादी घटकांचा समावेश सदर प्रकल्पात करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाची एकूण किंमत रुपये ५६ कोटी एवढी प्रस्तावित करण्यात आली.
(३) होय.
(४) व (५) गृह विभाग शासन आदेश दिनांक २१.०९.२०१७ अन्वये राज्यातील विविध शहरात सी.सी.टी.व्ही. प्रकल्प कार्यान्वित करणे हा विषय माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. त्यानुसार पंढरपूर शहरात सी.सी.टी.व्ही. प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबतचा प्रकल्प अहवाल (DPR) आवश्यक कार्यवाहीसाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाकडे पाठविण्यात आला असून सदर विभागामार्फत याबाबतची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## मुंबईतील म्हाडाच्या इमारत दुरुस्ती मंडळाच्या माध्यमातून शिवाजी पार्क येथील घरांचे परस्पर वितरण केल्याबाबत

**(७) * १०९८३१ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे**

**(आर्वी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील म्हाडाच्या इमारत दुरुस्ती मंडळाच्या माध्यमातून मास्टरलिस्टमधील घरांसाठी देण्यात येणाऱ्या शिवाजी पार्क येथील कोटयवधी रुपयांच्या घरांचे परस्पर वितरण करण्यात आले असल्याची माहिती ट्रांन्झिट कॅम्प असोशिएशनने दिली असल्याचे दिनांक २१ नोव्हेंबर, २०१७ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वितरण प्रक्रियेत आणखी काही घरे असण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात शासनाने चौकशी करुन या प्रक्रियेत गैरप्रकार करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) हे खरे नाही.

तथापि, श्री. प्रकाश गडकर यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र. २९७०/२०१६ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि. २९.०३.२०१७ रोजी दिलेल्या न्याय निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी पुनर्विकसित इमारत "बिल्डआर्च ओलिव्ह", शिवाजी पार्क, दादर येथील इमारत गाळा क्र. १०३ (क्षेत्रफळ ३०९ चौ.फु.) चे वितरण त्यांच्या मूळ गाळ्याच्या हक्कापोटी करण्यात आलेले आहे.

(२) हे खरे नाही.

बृहतसूचीवरुन गाळा वितरणासाठी प्राप्त अर्जाबाबत अर्जदाराने सादर केलेल्या कागदपत्रांची बृहतसूचीसमितीद्वारे तपासणी /छाननी करुन पात्र अर्जदारास मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत गाळ्यांचे वितरण करण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपलिका हद्दीतील उल्हासनदी जवळील जमिनीवर पूररेषा नियंत्रणाच्या आत बांधकाम परवानग्या दिल्याबाबत

**(८) * १०६६३० श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका हद्दीतील उल्हासनदी जवळील जमिनीवर पूररेषा नियंत्रणाच्या आत बांधकाम परवानग्या दिल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती काय निदर्शनास आले, तद्नुसार पूररेषा नियंत्रणाच्या आत केलेल्या बांधकामांवर तसेच बांधकाम विकासकांवर व बांधकाम परवानगी देणाऱ्या नगरपालिकेच्या सबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे.

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची तक्रार नगरपरिषदेस प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने कुळगाव बदलापूर नगरपरिषदेने कळविल्याप्रमाणे :-

- कुळगाव बदलापूर मंजूर विकास योजना नकाशावर पूरपातळी रेषा दर्शविण्यात आलेली नाही.
- मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार बांधकाम परवानगी देतांना नदी किनाऱ्यापासून किमान १५ मी. सामासिक अंतर राखणे आवश्यक आहे.
- प्राप्त तक्रारीतील उल्लेखित बांधकामास नदी किनाऱ्यापासून ३० मी. सामासिक अंतर सोडून नियमानुसार परवानगी देण्यात आली आहे.

तथापि, सदर प्रकरणी वस्तूस्थितीदर्शक अहवाल ४ आठवड्याच्या आत सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना निर्देशित करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयासाठी उपकरणे खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(९) * १०६२३३ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मनोहर भोईर (उरण), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबई महानगरपालिका रुग्णालयासाठी उपकरणे खरेदीसाठी मे.पिनॅकल बायोमेड या एका कंपनी ठेकेदाराकडूनच निविदा मागून त्याला पात्र करुन कोटयवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,
(३) असल्यास, तदनुसार उक्त प्रकरणी दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या चार रूग्णालयांकरीता आवश्यक उपकरणे खरेदी करणेकरीता ग्रुप-१ मध्ये ८० उपकरणे व ग्रुप-२ मध्ये ४९ उपकरणे अशा एकुण १२९ उपकरणांकरीता दोन स्वतंत्र निविदा माहे जुलै-२०१७ मध्ये ऑनलाईन पध्दतीने प्रसिध्द करण्यात आल्या.

त्याअनुषंगाने ग्रुप-१ करीता ८ निविदा प्राप्त झाल्या. सदर ८ निविदांपैकी निविदेच्या अटी व शर्तीनुसार मे. ड्रॅगर इंडिया प्रा. लि.व मे. पिनॅकल बायोमेड हे दोन निविदाकार पात्र ठरले. यापैकी बाब निहाय न्युनतम

असलेल्या मे. ड्रॅगर इंडिया प्रा. लि. यांना २ उपकरणे तर मे. पिनॅकल बायोमेड यांना १८ उपकरणे अशी एकुण २० उपकरणे खरेदीसाठी कार्यादेश देण्यात आले.

ग्रुप २ करीता ५ निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी अटी व शर्तीनुसार ३ निविदाकार पात्र ठरले. त्यातील न्यूनतम निविदाधारक मे. पिनॅकल बायोमेड कंपनीस ८ उपकरणे खरेदीसाठी कार्यादेश देण्यात आलेले आहेत.

उर्वरित उपकरणांच्या खरेदीसाठी फेरनिविदा प्रक्रिया महानगरपालिकेमार्फत सुरू आहे.

निविदेतील अटी व शर्तीबाबत मे. महाराष्ट्र सर्जिकल व इतर एजन्सींनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७१२/२०१८ दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील परळ येथील शहापूरजी-पालनजी वसाहत येथील झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याबाबत

**(१०) * १०४७९३ श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील परळ येथील शहापूरजी-पालनजी वसाहत, डॉ.एस.एस.राव रोड या ठिकाणच्या ९ हजार चौ.मीटर जागेवर असलेल्या झोपडपट्टीचा झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणांतर्गत पुनर्विकास करण्यात यावा अशी मागणी स्थानिक आमदार, खासदार, नगरसेवक व झोपडपट्टी सेवा संघाचे पदाधिकारी यांनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री व पंतप्रधान कार्यालय यांच्याकडे करुनही उक्त मागणीबाबत निर्णय झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी दिनांक २९ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरणाचे मुख्य अधिकारी, टाटा स्मारक रुग्णालयाचे प्रशासकीय अधिकारी, महापालिकेचे सक्षम विभागीय अधिकारी, स्थानिक आमदार आणि झोपडपट्टी सेवासंघाचे पदाधिकारी यांच्यात झालेल्या बैठकीत कोणताच निर्णय न झाल्याने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या

सुमारास  पुन्हा मा.गृहनिर्माण राज्यमंत्री यांच्या दालनात झालेल्या बैठकीत व पूर्वीच्या बैठकीत टाटा स्मारक रुग्णालयाच्या प्रशासनाकडून दरवेळी वेगवेगळ्या अटी व शर्ती ठेवल्या जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने झोपडपट्टीचा पुनर्विकास करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर बैठक दि.२३ फेब्रुवारी, २०१६ रोजी झाली नसून सदर बैठक दि. १९ सप्टेंबर २०१७ रोजी मा.राज्यमंत्री (गृहनिर्माण) यांच्या अध्यक्षतेखाली स्थानिक आमदार, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व टाटा मेमोरीयल हॉस्पिटलचे पदाधिकारी यांच्या समवेत संपन्न झाली.

सदर बैठकीमध्ये टाटा हॉस्पिटलचे प्रतिनिधी यांना डिपार्टमेंट ऑफ ॲटॉमिक एनर्जी यांच्याकडे ना-हरकत प्रमाणपत्राबाबत पत्रव्यवहार करण्याची विनंती करण्यात आली.

तसेच मुंबई शहरातील केंद्र शासनाच्या विविध यंत्रणांना दि.२५.०९.२०१७ रोजीच्या मा.मुख्य सचिव यांच्या स्तरावरील बैठकीसाठी बोलाविण्यात आले होते. त्यात टाटा मेमोरीयल हॉस्पिटलच्या प्रतिनिधींचा देखिल समावेश होता.
(३) प्रश्नांकित भूखंडाची मालकी इंडियन कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्यूट आणि टाटा मेमेरियल हॉस्पिटल या केंद्र शासनाच्या अखत्यारीतील असलेल्या संस्थांची आहे. महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ च्या कलम ३ Z-६ नुसार केंद्र शासनाच्या मालकीच्या जमिनीवरील झोपडपट्टयांच्या पुनर्वसनासाठी सदर अधिनियमातील तरतूदी In-Situ पुनर्वसनासाठी थेट लागू होत नाहीत. संबंधित जागेवरील झोपड्यांचे सर्वेक्षण जागा मोजणी व पुनर्वसन योजना राबविण्यासंदर्भात केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जव्हार (जि.पालघर) तालुक्यात झालेल्या भूकंपाबाबत

**(११) * १०४८५४ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय कदम (दापोली), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.पास्कल धनारे (डहाणू), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जव्हार (जि.पालघर) तालुक्यात भूकंपाच्या धक्क्यामुळे शिवली, वाळवंडा, डोहारेपाडा, धानोरी, जव्हार शहर आदी गावांतील घरांना तडे गेल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील सूर्या धरणाला धोका असल्याची भीतीही निर्माण झाली असून या भागात भूकंपाच्या धक्क्याची तीव्रता वाढत असताना, भूकंपाची तीव्रता मोजण्यासाठी प्रशासनाकडे भूकंपमापक यंत्र नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जव्हार व डहाणू (जि.पालघर) तालुक्यात भूकंपाचे किती धक्के बसले व त्या धक्क्यांची तीव्रता काय होती तसेच याबाबत शासनातर्फे नुकसानीची पहाणी करून ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना शासनाकडून मदत देण्याबाबत व भूकंपमापक यंत्र उपलब्ध करुन देण्यासह सदर भूकंपप्रवण क्षेत्रात भूकंप प्रतिकारक इमारती बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) होय.
(२) नाही.

सूर्या धरणाला धोका नाही. तसेच भूकंपाची तीव्रता मोजण्याचे भुकंपमापक यंत्र बसविण्यात आले आहे.
(३) पालघर जिल्ह्यातील जव्हार तालुक्यात भुकंपाचे ४ सौम्य धक्के बसले होते. त्यापैकी दि.२५.१२.२०१७ रोजी ३.४ व दि. ०२.०१.२०१८ रोजी ३.२ रिश्टर स्केल अशी धक्यांच्या तीव्रतेची नोंद झाली होती. ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना मदत देण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे. भूकंपाची तीव्रता मोजण्याचे भुकंपमापक यंत्र बसविण्यात आले आहे. भूकंप प्रतिकारक इमारती बांधण्याबाबत शासनाचे धोरण नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील म्हाडाच्या ५० संक्रमण शिबिरांची झालेली दुरवस्था

**(१२) * १०९४५१ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईत कुलाब्यापासून बोरीवली पर्यंत आणि सायनपासून विक्रोळी पर्यंत म्हाडाच्या ५० संक्रमण शिबिरात २२ ते २३ हजार घरे असून या घरात ३० ते ४० वर्षापासून रहिवाशी राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संक्रमण शिबिरातील घरांची दुरवस्था झाली असून घरांचे छत, लाद्या, पीलर, खिडक्या, संडास, बाथरुमचे दरवाजे हे तुटलेल्या अवस्थेत असून बहुतेक संक्रमण शिबिराची दयनिय अवस्था झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संक्रमण शिबिरात वर्षानुवर्षे वास्तव्य असलेल्या रहिवाश्यांकडून पुनर्विकासातून हक्काचे घर मिळणेसाठी शासनाकडे वारंवार मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संक्रमण शिबिरात राहणाऱ्या किती रहिवाश्यांना शासनाने पुनर्विकास केलेल्या इमारतींमध्ये सदनिका दिल्या आहेत व सद्य:स्थितीत एकूण किती रहिवाशी संक्रमण शिबिरात राहत आहेत,
(५) असल्यास, संक्रमण शिबिरातील उर्वरित रहिवाश्यांना त्यांच्या हक्काची सदनिका देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) अंशत: खरे आहे.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाकडून प्राप्त अहवालानुसार मुंबई शहर व उपनगरात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील एकूण ४१ संक्रमण शिबीरे असून सदर संक्रमण शिबीरात २२,८२४ संक्रमण गाळे आहेत. सद्य:स्थितीत सदर संक्रमण शिबीरात एकूण २५४ संक्रमण गाळे रिक्त आहेत.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

संक्रमण शिबिरातील काही गाळ्यांची दुरावस्था झालेली आहे. तथापि, दुरावस्था झालेल्या संक्रमण गाळ्यांची दुरुस्ती करण्यात येत आहे. तसेच दुरुस्ती न करता येण्यासारख्या व धोकादायक संक्रमण गाळ्यांमधील गाळेधारकांना इतर संक्रमण शिबिरात स्थलांतरित करण्यात आले आहे.
(३) होय, हे खरे आहे.

पात्र भाडेकरु/रहिवाशी यांच्या मागणीच्या अनुषंगाने उपलब्धतेनुसार पुनर्रचित इमारतीमध्ये तसेच बृहतसुचीवरुन कायमस्वरुपी सदनिकांचे वितरण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) होय.

बृहतसुची समितीद्वारे ३१,५४१ अर्जदारांस गाळ्यांचे वितरण करण्यात आले.

तसेच २०११ मध्ये ९१ व २०१५ मध्ये ३४६ अर्जदारांना कायमस्वरुपी गाळे वितरित करण्यात आले.

यात्यतिरिक्त मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांच्या मान्यतेने व पूर्वीच्या अर्जदारांना बृहतसुची समितीने एकूण २४ अर्जदारांना पात्र करुन गाळ्यांचे वितरण करण्यात आलेले आहे. सद्य:स्थितीत २२,५७० रहिवाशी संक्रमण शिबिरात राहत आहेत.

(५) व (६) प्राधिकरण ठराव क्र.६५२० च्या अनुषंगाने मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळामार्फत दि. ०५.०५.२०१७ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आली असून सदर जाहिरातीस अनुसरुन १२३४ अर्ज प्राप्त झाले असून प्राप्त अर्जांची पात्र/अपात्रता निश्चित करुन त्यानुसार गाळे वितरणाबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## अंबोली (ता.अंधेरी, जि.मुंबई) येथे एका डॉक्टर महिलेचा मृतदेह आढळून आल्याबाबत

**(१३) * १०५१७४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.भारत भालके (पंढरपूर), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबोली (ता.अंधेरी, जि.मुंबई) येथे डॉ. पुनम सातपुते या डॉक्टर महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह दिनांक २७ डिसेंबर, २०१७ रोजी आढळून आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे वा तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

परंतु, सदर मृतदेह दि. २६.१२.२०१७ रोजी मिळुन आला आहे.

(२) सदर प्रकरणी आंबोली पोलीस स्टेशन येथे अपमृत्यू नोंद क्र. ८९/१७, फौ.दं.प्र.स. कलम १७४ अन्वये दाखल करण्यात आला आहे. मृतदेहाचे शवविच्छेदन केल्यानंतर मृतदेहाचा व्हिसेरा रासायनिक तपासणी करीता कलिना, सांताक्रुझ येथे पाठविण्यात आला असुन सदर अहवाल अद्याप प्रलंबित आहे.

तसेच, नमुद अपमृत्युच्या अनुषंगाने केलेल्या चौकशीमध्ये मयत महिलेचा मृत्यु हा तिला असलेल्या गंभीर स्वरुपाच्या मधुमेहामुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीही संशयित बाब आढळुन आलेली नाही किंवा मयत महिलेचे वडील किंवा इतर कोणीही तिच्या मृत्युबाबत संशय अथवा तक्रार केलेली नाही. सदर अपमृत्यू तपासाधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कामगार नोंदणीअभावी शासकीय सुविधांपासून वंचित असल्याबाबत

**(१४) * १०८३८२ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नाका कामगारांसह बंदर कामगार, वीटभट्टी कामगार, ऊसतोड कामगार, खडी कामगार व रंग कामगारांना नोंदणीअभावी शासकीय सुविधांपासून वंचित रहावे लागत असल्याची बाब दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे भारतीय सेवा नाका कामगार संघटनेने दिनांक १ डिसेंबर, २०१७ रोजीपासून दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजीपर्यंत राज्यव्यापी जनजागृती अभियान राबविण्याचे काम सुरु केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार या कामगारांची नोंदणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाअंतर्गत इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येत असून नोंदीत पात्र बांधकाम कामगारास कल्याणकारी योजनांचा लाभ देण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) इमारत व इतर बांधकाम कामगारांची नोंदणी होण्यासाठी व मंडळाकडील विविध योजनांचा लाभ देण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

अ) राज्यातील सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती व सर्व मुख्याधिकारी नगरपरिषद/ सर्व वॉर्ड ऑफिसर महानगरपालिका, उपअभियंता, कामगार कल्याण मंडळाचे अधिकारी, कामगार विभागाचे अधिकारी यांना उद्योग, ऊर्जा व कामागार विभागाच्या दि. ०२.०१.२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये नोंदणी अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले.

ब) बांधकाम कामगारांच्या व्याख्येत बांधकामाशी संबंधित २१ कामे अंतर्भूत करून दि.१८.०८.२०१७ रोजी अधिसूचना निर्गमित केली आहे.

क) कामगारांची नोंदणी व लाभाचे वाटप परिणामकारक होण्यासाठी जिल्हा स्तरावर नोंदणी व लाभ वाटपाचा नियमित आढावा घेऊन अंमलबजावणी मधील सर्व अडीअडचणी दूर करण्यासाठी शासन निर्णय दि.६.१२.२०१७ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली संनियंतत्रण समितीचे पुनर्गठण करण्यात आले आहे.

ड) बांधकाम कामगारांची जास्तीत जास्त नोंदणी होण्यासाठी शासन अधिसूचना दि.१५.१.२०१८ अन्वये नोंदीत कामगाराचे वय ६० वर्ष होईपर्यंत त्याचेकडून रु.५/- ऐवजी रु.१/- (रुपये एक फक्त) इतके दरमहा अंशदान जमा करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जळगाव (जि.जळगाव) येथील औद्योगिक वसाहत क्षेत्रातील गीतांजली केमिकल्समध्ये झालेल्या दुर्घटनेबाबत

**(१५) * १०७६२५ श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव (जि.जळगाव) येथील औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) क्षेत्रातील गीतांजली केमिकल्समध्ये दिनांक ७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास क्लोरा-हायड्रो रसायन असलेल्या बॉयलरचा स्फोट होऊन त्यात ८ कामगार गंभीररित्या जखमी झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गीतांजली केमिकल्स कंपनीमध्ये स्फोट होण्याची ही तिसरी घटना असून सन २००६ मध्ये लागलेल्या आगीत तीन कामगारांचा मृत्यु झाला होता, तसेच या कंपनीने औद्योगिक सुरक्षा अधिनियम १९४८ व फॅक्टरी ॲक्ट १९४८ चे उल्लंघनही केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कारखाना निरिक्षकांनी या केमिकल्स कारखान्याची गत दोन वर्षात किती वेळा पाहणी केली होती व त्यामध्ये कोणकोणत्या त्रुटी आढळून आल्या आहेत,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) हे अंशतः खरे आहे.

दिनांक ०७/०१/२०१८ रोजी जळगांव येथील औद्योगिक वसाहत (एमआयडीसी) क्षेत्रातील गीतांजली केमिकल्स प्रा.लि. या कारखान्यात बॉयलरचा स्फोट झालेला नसून कारखान्यातील रिॲक्टरमध्ये स्फोट झाला व या घटनेत एकूण ०९ कामगारांना भाजले आहे.

(२) गिताजंली केमिकल्स प्रा. लि., या कारखान्यामध्ये स्फोट होण्याची ही तीसरी घटना नसून या पूर्वी दिनांक ०६/१०/२००६ रोजी सदरहू कारखान्यातील रिॲक्टरचा स्फोट होवून एकूण ०४ कामगार जखमी झाले होते. त्यापैकी एका कामगाराचा मृत्यू झाला होता.

सदरहू घटनेमध्ये कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ७A (२)(a) चे उल्लंघन झाले होते.

(३) कारखाने निरिक्षकांनी या केमिकल कारखान्याची सन २०१६ मध्ये दि.१०/०२/२०१६ रोजी पाहणी केली होती. २०१७ मध्ये पहाणी करण्यात आलेली नाही. दि.१०/०२/२०१६ रोजीच्या पहाणी दरम्यान कारखान्यांत विशेष अशा त्रुटी आढळून आल्या नव्हत्या. तथापि, मार्गदर्शनपर शेरे नमूद करण्यात आले होते व त्याची पुर्तता केल्याबद्दलचा अहवाल व्यवस्थापनाकडून प्राप्त झालेला आहे.

(४) होय चौकशी केली आहे.

दि.०७/०१/२०१८ रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने भोगवटादाराविरूध्द महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या कायदेभंगाबाबत मा. न्यायालयात तीन खटले दाखल केले आहेत.

तसेच या घटनेच्या अनुषंगाने कारखाने अधिनियम, १९४८ चे कलम ४० (२) अन्वये संबंधीत विभागाचा उत्पादन प्रक्रियेसाठी वापर न करण्याबाबत दि.१९/०१/२०१८ रोजी आदेश पारित केलेले आहेत.

तसेच सन २००६ मध्ये घडलेल्या घटनेचीही चौकशी करण्यांत आली असून, भोगवटादाराविरूध्द कारखाने अधिनियम १९४८ चे कलम ७A(२)(a) च्या कायदेभंगाबाबत मा. न्यायालयात एक खटला दाखल करण्यांत आला.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील महानगरपालिकेच्या निधीतून सुरु असलेल्या रस्त्यांच्या कामांचा दर्जा निकृष्ट असल्याबाबत

**(१६) * १०७३४६ श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील महानगरपालिकेच्या २४ कोटी रुपये निधीतून सुरु असलेल्या मिरजेतील रस्त्यांच्या कामांचा दर्जा निकृष्ट असून सदर रस्त्यांच्या कामांची तपासणी न करता महानगरपालिकेकडून ठेकेदाराला बिले पास करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ च्या पहिल्या सप्ताहात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची तक्रार स्थानिक नगरसेवकाकडून महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे.

(२) व (३) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत सन २०१७-१८ मध्ये मिरज शहरातील रस्त्यांची ८ कामे मंजूर असून त्यापैकी ४ कामे पूर्ण झाली आहेत. पूर्ण झालेल्या कामांपैकी त्रयस्थ यंत्रणेमार्फत तपासणी करुन घेण्यात आलेल्या कामांची देयके महानगरपालिकेमार्फत अदा करण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील कफ परेडमधील गीतानगर ते एनसीपीए परिसरालगत समुद्रात “ग्रीनपार्क” उभारण्याबाबत

**(१७) * १०५१८४ श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.अजित पवार (बारामती), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेट्रो-३ दरम्यान निर्माण होणाऱ्या टाकाऊ मातीची मुंबई कफ परेडमधील गीतानगर ते एनसीपीए परिसरालगत समुद्रात ३०० एकर जमीन निर्माण करुन तेथे "ग्रीनपार्क" उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या भरावामुळे कफ परेड परिसरातून मच्छिमारांना समुद्रात जाताना त्रास होणार असल्याने मच्छिमारांनी उक्त प्रकल्पास विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मातीच्या भरावामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होणार असल्याची बाब पर्यावरणतज्ञांनी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २.८.२०१७ रोजी शासनास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३० अन्वये मंजूरीसाठी सादर केलेल्या सुधारित प्रारुप विकास आराखडयामध्ये सदर पार्कचा प्रस्ताव नियोजिलेला आहे. समुद्रातील नैसगिक भागाचे पुन:प्रापण (रिक्लेमेशन) करण्याचा व त्या जागेचा वापर हा अन्य कोणत्याही कारणासाठी न करता केवळ सार्वजनिक मोकळया जागेसाठी करणेच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताव नियोजिलेला आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून, मेट्रो रेल्वे तसेच गरजेनुसार इतर स्त्रोतातून निघणारी माती या पुन:प्रापण (रिक्लेमेशन) करणेसाठी वापरणेचे प्रस्तावित आहे.
(२) होय.

तथापि स्थानिक मच्छिमार समूहाचे समुद्रात जाणे-येणे करण्याचे हक्क अबाधित राहतील याचा विचार करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेने प्रस्ताव नियोजिलेला आहे.
(३) मुंबई महापालिकेने पर्यावरणावर होणारा आघात मूल्यमापन अभ्यास करण्याकरिता सीएसआयआर-एनआयओ आणि सीएसआयआर-नीरी या तज्ञ संस्थांची नेमणूक केलेली आहे व त्यांचा अहवाल अद्यापी प्राप्त होणेचा आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये साहित्य खरेदीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१८) * १०८३६५ श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरातील, औद्यागिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) टेक्निकल हायस्कूल आणि ११ वी, १२ वी, व्होकेशनल ज्युनिअर कॉलेज मध्ये सन २०११ ते सन २०१४ या कार्यकाळात झालेल्या लेथ मशीन आणि इतर प्रकारच्या साहित्यांच्या खरेदीमध्ये १०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा अहवाल व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या तत्कालीन संचालकांनी पुराव्यानिशी दिल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गैरव्यवहाराच्या चौकशीकरीता उद्योग विभागाचे अतिरीक्त मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या समितीने साहीत्य खरेदीमध्ये गैरव्यवहार झाल्याचा अहवाल खुलाशासह दिला असून त्यात संचालनालयातील व शासनाच्या वरीष्ठ दर्जाचे अधिकाऱ्यांच्या संगनमताने संबंधित कामाचे कंत्राट कंत्राटदाराला दिल्याचे गंभीर स्वरूपाचे आरोप होऊनही त्यांच्यावर कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून कोणत्याही प्रकारची कायदेशीर कारवाई न होण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुषंगाने दोषी असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) तत्कालीन संचालक (व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी त्यांच्या दि.१८.१०.२०१४ व दि.१०.१२.२०१५ च्या पत्रान्वये व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयात सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात लेथ मशिन व इतर प्रकारच्या साहित्य खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता होऊन भ्रष्टाचार झाल्याबाबत शासनास अहवाल सादर केला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामध्ये सन २०११-१२, २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षात खरेदीमध्ये प्रशासकीय व वित्तीय अनियमितता होऊन आर्थिक भ्रष्टाचार झाल्याबाबत तसेच सन २०१३-१४ मध्ये दरकरार पत्रावर खरेदी करण्यात आलेल्या SSSC Lathe All Geared Stock-१५०० खरेदी प्रकरणी झालेली प्रशासकीय व वित्तीय अनियमितता, फसवणूक व निधीचा गैरव्यवहार या प्रकरणी सखोल चौकशी करण्यासाठी दि.२९.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली आहे.

(३) (४) व (५) अद्यापपर्यंत समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

सदर अहवाल सादर करण्यासाठी समितीने मुदतवाढ देण्याच्या केलेल्या विनंतीनुसार शासनाने दि.१७.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये २ महिन्याची मुदतवाढ दिलेली आहे.

-----------------

## मुंबईतील अंधेरी (प) येथील साकीनाका येथे फरसाण बनविणाऱ्या कारखान्याला लागलेल्या आगीत १२ कामगारांचा झालेला मृत्यू

**(१९) * १०६००७ डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव),**

**श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.संजय कदम (दापोली), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी प. (मुंबई) येथील साकीनाका येथे खैराणी रोडवरील फरसाण बनविणाऱ्या भानू फरसाण या दुकानाला आग लागून १२ मजुरांचा मृत्यू झाल्याची बाब दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधीत दोषी कारखाना मालकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर आगीच्या दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबाला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) तसेच, सदर आग लागण्याच्या प्रकरणाची चौकशी करण्याकरीता नेमलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल मुंबई महानगरपालिकेस सादर केला असल्यास, सदर अहवालात नमूद केलेल्या प्रमुख बाबींनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंधेरी (पश्चिम) येथील साकीनाका येथे खैराणी रोडवरील फरसाण बनविणाऱ्या दुकानाला लागलेल्या आगीत एकूण १२ व्यक्तींचा मृत्यु झाला असून, १ व्यक्ती जखमी झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने केलेल्या चौकशीत, सदर आग सदोष विद्युत प्रणालीमुळे लागल्याचे आढळून आले आहे.

सदर घटनेची चौकशी करण्याकरिता नियुक्ती केलेल्या समितीस, सदर दुकानात मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ नुसार परवानगी न घेता तसेच, अग्निशमन विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आलेले नसतांनादेखील अनधिकृतपणे व्यवसाय सुरु असल्याचे आढळून आले.

सदर प्रकरणी दुकान मालकावर साकीनाका पोलीस ठाणे येथे दिनांक १८.१२.२०१७ रोजी गु.र.क्र. ७५५/२०१७ कलम ३०४, २८५, ३३७ भा.द.वि. संहिता सह मुंबई महानगरपालिका अधिनियम ३९०, ३९४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून, दुकान मालकास अटक करण्यात आली आहे.

(३) सदर दुर्घटनेत मृत्यु झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

(४) व (५) सदर घटनेची चौकशी करण्यासाठी नेमलेल्या समितीने दिनांक १०.०१.२०१८ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना चौकशी अहवाल सादर केला आहे.

त्यानुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कारवाई/कार्यवाही करण्यात आली आहे:-

- एक स्वच्छता निरीक्षकास सेवेतून निलंबित करण्यात आले आहे.
- “एल” विभागातील सहाय्यक अभियंता (इमारती व कारखाने) यांच्या अखत्यारीतील संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द खात्यांतर्गत संक्षिप्त चौकशीची कार्यवाही सुरु आहे.
- सदर मालमत्ता भांडवली मुल्याधारित करप्रणालीमध्ये संक्रमित करुन तिचे करनिर्धारण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहेत.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सिडको संपादित बामणडोंगरी गावात अनेक मूलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबत

**(२०) * १०४८७५ श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (जि.रायगड) तालुक्यातील सिडको संपादित बामणडोंगरी गावात अनेक मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गावाला पाणी पुरवठा करणा-या पाईपलाईनचे चेंबर पाण्याने पूर्णपणे भरले असून त्यात किडे पडले असुन हे पाणी गावाला पुरविण्यात येत असल्याने अनेक नागरिकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सिडको प्रशासनाकडे वारंवार तक्रार करुनही याबाबत कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सिडको संपादित क्षेत्रातील बामणडोंगरी हे गांव ग्रामपंचायत वहाळ मध्ये समाविष्ट असून गावांतर्गत सेवासुविधा पुरविणे व त्यांची देखभाल दुरुस्ती वहाळ ग्रामपंचायतीमार्फत करण्यात येते. बामणडोंगरी या गावाचा समावेश उलवे नोडमधील सेक्टर १९-बी मध्ये होत असल्याने त्या गावातील मूलभूत सुविधांचा सुधार करण्याबाबत ग्रामपंचायतीने पारीत केलेला ठराव सिडकोच्या विचाराधीन आहे.

(२), (३) व (४) बामणडोंगरी गावासाठी सिडकोच्या २०० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीवरुन ५० मि.मी. व्यासाच्या नळजोडणीने पाणीपुरवठा करण्यात येत असून या नळजोडणीवर कुठल्याही प्रकारचे चेंबर नाही. या जलवाहिनीवरील व्हॉल्व चेंबर वेळोवेळी साफ करण्यात येते, तसेच सदर गाव वा गावालगतच्या इतर रहिवासी क्षेत्रातून दूषित पाणीपुरवठा होत असल्याची कोणतीही तक्रार सिडकोकडे प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत फेरनिविदा प्रक्रियेमध्ये झालेली अनियमितता

**(२१) * १०८३९१ श्री.विजय काळे (शिवाजीनगर), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात समान पाणीपुरवठा योजनेंतर्गत शहरात सोळाशे किलोमीटर लांबीच्या जलवाहिन्या टाकणे, पाण्याचे मीटर बसविणे ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी चर खोदणे आणि देखभाल दुरुस्तीसाठीच्या फेरनिविदा काढण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाचे सल्लागार म्हणून एसजीआय कंपनीची नियुक्ती करण्यात आली आहे काय, तसेच सदर कंपनीने पुणे शहरात समान पाणीपुरवठा योजनेकरिता आर्थिक आराखडा तयार करून महानगरपालिकेकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अंतिम आराखड्याला मुख्य सभेची कोणतेही मान्यता न घेता अंतिम स्वरूप देण्यात आले आहे काय, तसेच सदर एसजीआय कंपनीने वेळेत पाणी गळतीचा अंतिम अहवाल सादर न करता कोट्यवधी रुपयाच्या कामाला मान्यता दिल्याने पुणेकरांवर कोट्यवधी रुपयांच्या कर्जाचा आर्थिक भार पडेल, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, पुणे शहरातील समान पाणीपुरवठा योजनेची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिकदृष्ट्या तपासणी करून निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकल्पाच्या मुळ आराखड्यास (DPR) मुख्यसभा, पुणे महानगरपालिका यांनी ठराव क्र.६०, दि.२२.५.२०१५ अन्वये मान्यता दिलेली आहे. तथापि, सुधारित प्रकल्प आराखड्याला मुख्यसभेची मान्यता आवश्यक नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

एस. जी. आय. या सल्लागार कंपनीने निविदेतील अटी व शर्ती नुसार पाण्याच्या गळतीबाबत आवश्यक अहवाल सादर केला आहे.

(४) फेरनिविदा प्रक्रिया करण्यापूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून तांत्रिकदृष्ट्या तपासणी करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दौंड (जि.पुणे) येथील राज्य राखीव दलाच्या सहायक पोलीस निरिक्षकाने केलेल्या गोळीबारात ३ व्यक्तींचा झालेला मृत्यू

**(२२) * ११०७३८ श्री.राहूल कुल (दौंड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) येथील राज्य राखीव पोलीस दल क्र. ७ च्या एका सहायक पोलीस निरीक्षकाने दिनांक १६ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दौंड परिसरात गोळीबार करून ३ व्यक्तींचा खून केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गोळीबारात मृत झालेल्या नागरिकांच्या वारसांना शासनाकडून मदत मिळावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतीनिधिनी दिनांक २३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गोळीबार प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले आहे व तद्नुसार संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच मृत्यु झालेल्यांच्या वारसांना मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

तथापि, सदर घटना ही दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी घडलेली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी दौंड (जि.पुणे) येथील राज्य राखीव पोलीस गट नंबर ७ (मूळ नेमणूक - आय.आर.बी. कोल्हापूर ग्रूप) च्या सहायक पोलीस

उपनिरीक्षकाने दिनांक १६ जानेवारी, २०१८ रोजी दौंड परिसरात गोळीबार करून ३ व्यक्तींचा खून केल्याप्रकरणी त्या सहायक पोलीस उपनिरीक्षका विरूद्ध दौंड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५१/२०१८ भादंवि कलम ३०२, आर्म ॲक्ट ३,२५,२७ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हा तपासावर आहे.

सदर गोळीबारामध्ये मृत्यू मुखी पडलेल्या ३ व्यक्तींच्या वारसांना मदत देण्याबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जेएनएनयुआरएमअंतर्गत प्रकल्पासाठी घेतलेल्या २०० कोटी रुपयांच्या कर्जावरील व्याजाचा नागपूर महानगरपालिकेला भुर्दंड बसत असल्याबाबत**

**(२३) * १०५९२६ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेएनएनयुआरएमअंतर्गत बँक ऑफ महाराष्ट्रकडून नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना पेच -४ च्या भाग १ साठी व इतर प्रकल्पासाठी ८.५ टक्के दराने २१२.१६ कोटी कर्ज घेण्याबाबत दिनांक २८ जून, २०१० मध्ये महानगरपालिका व बँक ऑफ महाराष्ट्र यांच्यामध्ये करार करण्यात आला असताना सुध्दा कराराचे उल्लंघन करुन ९.५% दराने व्याज लावून सदर रक्कम वसूल करीत असल्याने नागपूर महानगरपालिकेला करोडो रूपयांचा भुर्दंड बसत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पासाठी इतर वित्तिय संस्थानी या व्याज दरापेक्षाही कमी दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची तयारी दर्शविली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ८.५ टक्के दराने करार करून सुध्दा ९.५ टक्के दराने व्याज लावून महानगरपालिकेला झालेल्या करोडो रुपयांच्या नुकसानी प्रकरणी शासनाने सखोल चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) • केंद्र शासन पुरस्कृत जेएनएनयुआरएम अंतर्गत नागपूर शहर वाढीव पाणी पुरवठा योजना पेंच-४, भाग-१ व इतर प्रकल्पाकरीता महानगरपालिकेच्या हिश्याचे रु.२००.०० कोटी निधीच्या अनुषंगाने कर्ज उभारणीसाठी बँक ऑफ महाराष्ट्र व नागपूर महानगरपालिका यांच्यामध्ये दिनांक ३१ मार्च, २०१० रोजी करार करण्यात आला आहे.

• बँक ऑफ महाराष्ट्र व नागपूर महानगरपालिका यांच्यामध्ये सदर कर्जाचा व्याज दर हा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे धोरणानुसार (करारनाम्याच्या अटी व शर्ती प्रमाणे) व्याज दर ९.५०% (बीपीएसआर २.७५%) असा होता. सदर प्रकरणी वाटाघाटीव्दारे हया कर्जाचा सुधारित व्याज दर ८.५० टक्के (बीपीएलआर ३.७५%) असा अंतीम करण्यात आलेला आहे.

• सदर व्याज दर हे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या व्याजदरात (बीपीएलआर) वेळोवेळी होणाऱ्या बदलाप्रमाणे कमी जास्त (फ्लोटिंग) होणारा आहे. त्यानुसारच व्याजदर आकारण्यात येत आहे.

(२) बँक ऑफ महाराष्ट्र सोबत झालेल्या करारनाम्याच्या दिनांकास अन्य कोणत्याही वित्तीय संस्थेने नागपूर महानगरपालिकेस यापेक्षा कमी दराने कर्ज उपलब्ध करण्याची तयारी दर्शवली नव्हती.

(३) बँक ऑफ महाराष्ट्र कडून आकारण्यात येणारा व्याजदर हा मूळ करारनाम्यानुसार व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सुधारीत धोरणानुसार व्याजाची आकारणी करण्यात येत असल्याने महानगरपालिकेचे नुकसान झाले नाही असे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दादरमधील इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामाबाबत

**(२४) * १०५९१४ श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.दिलीप वळसे-पाटील**

**(आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील दादरमधील इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या कामास २३ महिन्यांचा विलंब झाल्यामुळे स्मारकाच्या खर्चात रुपये १६६ कोटींची वाढ झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्मारक कामास अद्याप सुरुवात न झाल्याने मा. मुख्यमंत्री महोदयांनी येत्या महिन्याभरात कामाला सुरुवात होईल असे जाहीर आश्वासन दिनांक ६ डिसेंबर, २०१७ रोजी दिले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्मारकाचे भूमिपूजन झाले त्यावेळी शासनाने याकरिता रुपये ४२५ कोटी खर्च येणार असल्याचे प्रस्तावित केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वाढीव रुपये १६६ कोटींच्या खर्चाबाबत शासनाने तरतूद केली आहे काय व सदर स्मारकाच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशी बाब नाही.
(२) ते (५) प्रस्तावित स्मारकाच्या बांधकामासाठी प्राधिकरणाने रक्कम रु. ६०० कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिलेली होती. दिनांक १४.४.२०१७ रोजी रचना व बांधणे तत्वावर निविदा (निविदा किमंत रु. ५९१ कोटी) मागविणेत आलेल्या होत्या. दिनांक १२ जुलै २०१७ रोजी निविदापूर्व बैठक झाली. त्यामध्ये पुतळ्यातील लोह सळई व स्ट्रक्चरल स्टील समुद्रकिनाऱ्याच्या वातावरणामुळे गंजू नये म्हणून आय.आय.टी. मुंबई यांचा सल्ला घेवून त्यानुसार सुधारित अंदाजपत्रक (रु. ६२२.४० कोटी) तयार करणेत आलेले होते. निविदा स्विकारणेची मुदत दिनांक २४.१०.२०१७ पर्यंत वाढविणेत आलेली होती. तथापि मे.शापुरजी पालनजी कंपनी प्रा.लि. यांची एकच निविदा प्राप्त झाली. त्यानंतर पुनश्च निविदा मागविणेत आल्या असता मे. शापूरजी पालनजी कं.प्रा.यांची निविदा प्राप्त झाली. त्यांची सदर कामाची निविदा रक्कम रु. ७०९ कोटी इतकी मंजूर

करण्यात आलेली आहे. सदर कामाच्या रु. ७६३.०५ कोटी इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. निविदा स्विकृतीचे पत्र ठेकेदारास दिनांक २.१.२०१८ रोजी देवून दिनांक ९.२.२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देणेत आलेले असून प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली आहे.

-----------------

## भीमा-कोरेगाव, (ता.शिरुर, जि.पुणे) येथील दंगलीचे राज्यभर उमटलेले पडसाद

**(२५) * १०५५४० श्री.मोहन फड (पाथरी), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.संजय कदम (दापोली), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.राहूल कुल (दौंड),**

**श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.इम्तीयाज सय्यद (औरंगाबाद मध्य), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अनिल बाबर (खानापूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भीमा-कोरेगाव, (ता.शिरुर, जि.पुणे) येथील विजय स्तंभाला दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी दोनशे वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात आलेल्या जनसमुदायावर काही समाजकंटकानी दगडफेक केल्यामुळे मोठ्या प्रमाणात दंगल उसळली व त्यात एका व्यक्तीचा मृत्यू झाला व अनेक व्यक्ती जखमी झाल्या, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरेगाव - भीमा येथील दंगलीचे पडसाद नांदेड जिल्ह्यात उमटून येथील हदगाव तालुक्यातील आष्टी येथे राज्य राखीव पोलीस दलाच्या जवानांच्या लाठी हल्यात योगेश जाधव हा विदयार्थी मृत्यूमुखी पडला असल्याचा आरोप त्याच्या नातेवाईकांनी केला असून या घटनेची न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर घटनेच्या अनुषंगाने दलित संघटनांनी तसेच राजकीय पक्षाने न्यायालयीन चौकशी करण्याची मागणी जिल्हाधिकारी, पुणे तसेच मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या हिंसक प्रवृत्तीचा निषेध करण्यासाठी कल्याण-डोंबिवली परिसरात शांततेचे वातावरण तयार करण्यासाठी दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी काढलेल्या मोर्चावर कारवाई करुन कार्यकर्त्यांना बेदम मारहाण करुन २२ जणांना अटक करुन त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले, त्यामुळे कोळशेवाडी पोलीस ठाण्यावर मोर्चा नेवून खोटे गुन्हे दाखल करणाऱ्या व त्यांना बेदम मारहाण करणाऱ्या सहाय्यक पोलीस आयुक्त व सहकारी पोलीस यांची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी राजकीय पक्ष व नागरिकांनी पोलीस उपायुक्त यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सदरील घटनेचे तीव्र पडसाद राज्यभरात सर्वत्र उमटल्याने दिनांक ३ जानेवारी, २०१८ रोजी राज्यभरात बंद पुकारुन महामार्ग रोखून मोठ्या प्रमाणात

गाड्यांची तोडफोड, दुकाने, शासकीय वाहने, खाजगी गाड्या इ. तसेच शासकीय व खाजगी मालमत्तांचेही करोडो रुपयांचे नुकसान होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, शासनाने सदर घटनेची न्यायालयीन चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार या घटनेस जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच मृत व्यक्तींच्या कुटूंबाला आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) कोरेगांव भिमा येथे दि. १ जानेवारी, २०१८ रोजी दोन गटात वाद होवून दगडफेक झाली असून त्यात एका व्यक्तीचा मृत्यु झालेला आहे.
(२) कोरेगांव भिमा येथील दंगलीचे पडसाद नांदेड जिल्हयात उमटून वाहनांवर दगडफेक व दुचाकी वाहने जाळण्याचे प्रकार नांदेड शहरात, हदगांव, हिमायतनगर, कंधार, किनवट येथे घडलेले आहेत.

हदगांव तालुक्यातील आष्टी या गावातील योगेश जाधव यांचे मृत्यू प्रकरणी पोलीस स्टेशन तामसास, जि.नांदेड येथे आकस्मिक मृत्यू क्र.१/२०१८ कलम १७४ फौजदारी प्रक्रिया संहिता अन्वये दाखल करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणाची न्यायालयीन चौकशीची मागणी केली असून सदर प्रकरणाची दंडाधिकारीय चौकशीचे आदेश जिल्हादंडाधिकारी नांदेड यांनी दिलेले आहेत. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.
(३) होय.
(४) कल्याण-डोंबिवली परिसरात सदर प्रकरणी एकूण २३ गुन्हे दाखल आहेत. दि.०३.०१.२०१८ रोजी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून सौम्य लाठीचार्ज करण्यात आला. सदर प्रकरणी कोळसेवाडी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ७/२०१८ भां.द.वि. कलम १४१, १४२, १४३, १४४, १४७, १४८, १४९, ३५३ सह मु.पो.का. कलम ३७(१), १३५, भा.ह.का.३ (२५) क प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी २२ आरोपींना अटक केली असून सध्या ते जामिनावर मुक्त आहेत.

सदर प्रकरणी सहायक पोलीस आयुक्त, डोंबिवली व त्यांच्या सहकाऱ्यावर कार्यवाही करण्याबाबतचे निवेदन प्राप्त झाले आहे.

(५) दि. ३ जानेवारी, २०१८ रोजी दलित संघटनांनी पुकारलेल्या महाराष्ट्र बंद दरम्यान खाजगी व सरकारी मालमत्तेचे नुकसान झाले हे खरे आहे. सदर घटनेच्या दिवशी योग्य तो पोलीस बंदोबस्त नेमून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा प्रयत्न केलेला आहे.

(६) सदर घटनेच्या न्यायालयीन चौकशीकरीता दि. ०९.२.२०१८ च्या अधिसूचनेन्वये न्यायालयीन चौकशी आयोग नेमला आहे. मृत व्यक्तीच्या कुटुंबाला शासनाच्या वतीने दहा लाख रुपयाची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे, जीआयएस-जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणाचे कामात कोट्यवधी रुपयांचा झालेला गैरव्यवहार

**(२६) * १०५०५२ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथील जीआयएस-जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणाच्या कामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे अधिकार क्षेत्रात मिळकतीचे सर्वेक्षण व जीआयएस करणेकामी मिळकतीच्या वापरातील बदल, अतिरिक्त बांधकाम, कर आकारणी झाल्या नसलेल्या मिळकती, जीपीएस अक्षांश व रेखांश, मिळकत छायाचित्रे व तद्‌नुषंगीक माहिती संकलनासाठी दिनांक २० सप्टेंबर, २०१७ रोजी सार आयटी रिसोर्स प्रा.लि., मुंबई या संस्थेकडील सर्वेअर व अन्य पदाधिकारी यांना पुणे महानगरपालिका प्रशासनाने सही-शिक्क्यासह अधिकार प्रदान केले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जीआयएस-जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणासाठी सार आयटी रिसोर्स प्रा.लि., मुंबई.६२ या संस्थेस सर्वेक्षणासाठी देण्यात आलेल्या सर्वेक्षणाच्या

कामामध्ये गैरव्यवहार झाला असून सदरच्या कंपनीने शासनाची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केली असल्याचे मा.आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना लेखी पत्राद्वारे कळविले असतांना देखील कोणतीच कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जीआयएस/जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणासाठी सार आयटी रिसोर्स प्रा.लि., मुंबई या संस्थेस झोन क्र.१, ३ व ४ मधील मिळकतींसाठी दिलेल्या मुदतीत मिळकतींचे जीआयएस/जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षण (नोंदी) झाल्या नसून सर्वेक्षण न झालेल्या मिळकतींसाठी कंपनीला रक्कम अदा करण्यात आली असल्याचे सर्वेक्षणासाठी कंपनीला झोन क्र.१, ३ व ४ मधील मिळकतींचे सर्वेक्षणासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत अनियमितपणे मनुष्यबळ पुरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, पुणे महानगरपालिकेने जीआयएस-जीपीएस मालमत्ता कर सर्वेक्षणासाठी नेमलेल्या संस्थेने शासनाची कोट्यवधी रुपयांची आर्थिक फसवणूक केली असून कंपनी तसेच त्यास अनियमितपणे सहकार्य करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस** : (१) व (२) • फेब्रुवारी २०१८ मध्ये सजग नागरी मंच या संस्थेने प्रस्तुत प्रकरणी माहिती अधिकारामध्ये अर्ज सादर केला होता.

• पुणे महानगरपालिकेचे मालमत्ता कराची आकारणी करण्यासाठी जी आय. एस. व जी.पी.एस. प्रणालीचा वापर करुन झोन क्र. १, ३ व ४ मधील मिळकतींचे सर्वेक्षण करण्याचे काम मे. सार आयटी रिसोर्सेस प्रा.लि. या कंपनीस सोपविण्यात आले आहे.

• सर्वेक्षण सुरळीत होण्याच्या दृष्टीकोनातून सदर संस्थेच्या सर्वेअर व अन्य कर्मचाऱ्यांना ओळखपत्रे देण्यात आलेली आहेत, तथापि अधिकार प्रदान करण्यात आलेले नाहीत.

(३) • स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १६/९/२०१७ च्या पत्रान्वये मे.सार आयटी रिसोर्स प्रा.लि. या संस्थेस देण्यात आलेल्या कंत्राटाच्या अनुषंगाने विविध मुद्याबाबत उप आयुक्त, कर आकारणी व कर संकलन, पुणे महानगरपालिका यांचेकडे माहिती मागितली होती.

• सदर माहिती पुणे महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

(४) • या कामाचे कार्यादेश दिनांक २४/६/२०१६ रोजी देण्यात आलेले होते तथापी जीआयएस सर्वेक्षण प्रणाली विकसीत करण्याचे कामकाज पुर्ण झाले नव्हते. सदर प्रणाली दिनांक २२/१०/२०१६ रोजी पुर्ण झाली.

• कार्यादेशातील अटीनुसार प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे कामकाज दिनांक १/११/२०१६ पासून सुरु झाले त्यामुळे प्रत्यक्ष कामाची मुदत सदर कंपन्यांना दिनांक १/११/२०१६ पासून पुढे ९ महिन्यांकरीता देण्यात आली.

• या प्रकरणी मुदत संपुष्टात आल्यानंतर केलेल्या कामाबाबत कंपन्यांना विहीत केलेल्या दरापेक्षा कमी दर अदा करण्यात आले आहेत.

• मे. सार आयटी रिसोर्सेस प्रा.लि. या कंपनीने आज अखेर एकूण रु.३,७८,८८०/- एवढ्या मिळकतींचे सर्वेक्षण पुर्ण केले आहे.

• कंत्राटदारास रु. ५,२१,७५,७९६/- एवढी रक्कम अदा केली असून अद्याप रु. ८७,८२,३१०/- एवढी रक्कम अदा करणे बाकी आहे.

• सदर देयके अदा करण्याबाबत पुणे महानगरपालिकेमध्ये त्रिस्तरिय कार्य पद्धती निश्चित केलेली आहे.

• ज्या मिळकतींच्या सर्वेक्षणाचे कामकाज कंपन्यांनी पुर्ण केलेले आहे त्याचेच देयक अदा करण्यात आले आहे.

• कामकाज पुर्ण न झालेल्या अथवा प्रशासकीय स्तरावर प्रलंबित असलेल्या कोणत्याही मिळकतीच्या कामाचे देयक अदा करण्यात आलेले नाही.

• या कामाकरीता पुणे महानगरपालिकेकडून मनुष्यबळ पुरविण्यात आलेले नाही असे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मे.साईराज एंटरप्राईजेस तर्फे विकासकाने महानगरपालिका क्षेत्रातील भूखंडावर अनधिकृत बांधकाम केल्याबाबत

**(२७) * १०६२५६ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथील मे.साईराज एंटरप्राईजेस तर्फे कुलमुखत्यारधारक विकासक श्री.जयराम अमरलाल कुकरेजा यांनी उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील सीटी सर्व्हे नं.२७३४४, २७३४५ ते २७३४९, २७८५१ ब, २७८५१ क, २७८५१ ड, ई, फ, ह, ध, रा बॅरेक नं.२१२३ रूम नं.१ ते ६, शिट नं.७३ या भूखंडावर अनधिकृत बांधकाम केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बांधकामात १ ते ७ मजले बांधण्याचा नकाशा मंजूर केलेला आहे व त्याचा उल्लेख बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रात नमूद केलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्रात नमूद केलेल्या अटी प्रमाणे विकासकाने बांधकाम करणे नियमानुसार आवश्यक व बंधनकारक असतानाही त्या ठिकाणी ८ वा मजला अनधिकृतपणे बांधलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार अनधिकृत बांधकाम पाडण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय. सदर ठिकाणी तळघर + तळमजला + ७ मजल्यांच्या बांधकामास उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक २२.१२.२०१४ रोजी परवानगी देण्यात आली आहे.

(३), (४), (५) व (६) हे खरे नाही. सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण झालेले असून रहिवास वापर सुरु आहे. या ठिकाणी ८ व्या मजल्याचे बांधकाम झालेले नाही.

-----------------

## वसंतराव नाईक विकास महामंडळाच्या धुळे जिल्हा व मुंबई कार्यालयात झालेल्या अपहाराबाबत

**(२८) * १०५५२७ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **विमुक्त जाती/भटक्या जमाती व इतर मागासवर्ग आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसंतराव नाईक विकास महामंडळाच्या धुळे जिल्हा व मुंबई कार्यालयात रुपये ५० लाखांच्या अपहार प्रकरणी प्रादेशिक व्यवस्थापक यांनी नाशिक शहर पोलीसात दिनांक १३ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार दोषींवर कारवाई करण्याबाबत तसेच अपहाराची रक्कम परत मिळविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा. राम शिंदे :** (१), (२), (३) व (४) वसंतराव नाईक विमुक्त जाती, भटक्या जमाती विकास महामंडळातील श्री.रवि गंगाराम गवल, जिल्हा व्यवस्थापक, नाशिक यांनी शासनाची किंवा महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकांची परवानगी न घेता तसेच विहित कार्यपध्दती न अवलंबता परस्पर महामंडळाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांविरुध्द दि.१३.१२.२०१७ रोजी धुळे शहर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. दिनांक १९ डिसेंबर २०१७ व दि. ४ जानेवारी २०१८ च्या पत्रान्वये पोलीस अधीक्षक, धुळे यांनी कळविल्यानंतर या गुन्हयामध्ये आर्थिक गैरव्यवहार झाला आहे किंवा कसे याबाबत चौकशी करण्यासाठी सह सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांची दि.१७.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये नियुक्ती करुन ३० दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

-----------------

# येरवडा (जि.पुणे) येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात वैद्यकीय उपकरणे खरेदीतून निर्माण झालेला वाद

**(२९) * १०५८१५ प्रा.(श्रीमती) मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येरवडा (जि.पुणे) येथील महानगरपालिकेच्या राजीव गांधी रुग्णालय व सोनवणे प्रसूती गृह येथे आवश्यक असलेली वैद्यकीय उपकरणे खरेदी करण्यासाठी काढण्यात आलेल्या १ कोटी ७५ लाख रुपयांच्या साहित्य खरेदी-निविदा प्रक्रिया वादात असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आरोग्य विभागाने अमेरिकेतील अन्न व औषध विभागाची परवानगी असणे सक्तीचे केले असल्यामुळे एकही भारतीय कंपनीला उपकरणे स्वस्तात तयार करत असतानाही या निविदा प्रक्रियेत सहभागी होता येत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) पुणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी रूग्णालय, सोनावणे प्रसुतिगृह व अन्य दोन रूग्णालयात नवजात अर्भक अतिदक्षता विभाग सुरू करण्यात येणार असून त्याकरीता आवश्यक उपकरणे खरेदी करण्यासाठी रू.१ कोटी ७५ लक्ष एवढ्या रकमेची निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

सदरची उपकरणे उच्च दर्जाची असणे आवश्यक असल्याने निविदेमधील काही उपकरणांना USFDA (अमेरिकन अन्न व औषध प्रशासन) च्या प्रमाणपत्राची अट बंधनकारक करण्यात आली होती.

निविदेतील सदर अट मान्य नसल्याने NIDUS Exim Pvt.Ltd. या कंपनीने तसेच सजग नागरी मंच या संस्थेने पुणे महानगरपालिकेकडे लेखी हरकत घेतली होती.

त्यानुसार पुणे महानगरपालिकेने सदरची अट शिथिल करून निविदेमध्ये Generic स्पेसिफिकेशनचा अंतर्भाव करून फेर जाहिरात प्रसिध्द केलेली आहे.

या निविदाप्रक्रियेबाबतची पुढील कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांमधील गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३०) * १०५४१५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.संतोष दानवे (भोकरदन), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांमधील गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्यासाठी नागरीकांनी प्रधान सचिव, महसूल यांचेकडे माहे जानेवारी,

२०१८ च्या दुस-या आठवड्यात मागणी केलेली होती, त्यानुसार एमएमआरडीए परिसरातील ठाणे, रायगड जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध करुन देण्याचे सर्व जिल्हाधिकाऱ्यांना आदेश दिलेले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी गिरणी कामगारांच्या मागण्यांचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उक्त प्रश्नी अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तद्नुसार वर्षानुवर्षे घरांच्या प्रतिक्षेत असलेल्या गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मुंबईतील बंद पडलेल्या गिरण्यांमधील गिरणी कामगारांना मुंबई किंवा मुंबई महानगर प्रदेशात घरे उपलब्ध करुन द्यावी अशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे. यासंदर्भात दिनांक ६.१०.२०१७ रोजी मा.मुख्यसचिव यांचेकडे आयोजित बैठकीमध्ये गिरणी कामगारांच्या गृहनिर्माणासाठी मुंबई महानगर प्रदेशामध्ये शासकीय जागा उपलब्ध करणेबाबत चर्चा झाली. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी ठाणे, रायगड व पालघर यांना शासनाच्या दिनांक २९ जानेवारी, २०१८ च्या पत्रान्वये त्यांच्या जिल्हयात गिरणी कामगारांच्या घरांसाठी निर्बाध्यरित्या उपलब्ध असलेली जागा निश्चित करुन गिरणी कामगार कृती संघटनेच्या पदाधिकारी यांचे समवेत अशा जागेची पाहणी करुन गिरणी कामगार कृती संघटनेच्या पसंतीनुसार गिरणी कामगारांच्या गृहनिर्माण योजनेसाठी जागा मंजूरीबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यास कळविले आहे.

-----------------

## डहाणू (जि.पालघर) येथील समुद्रात सहलीसाठी गेलेल्या के.एल.पोंडा ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांचा बोट बुडाल्याने झालेला मृत्यू

**(३१) * १०५४२५ श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव**

**पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू (जि.पालघर) तालुक्यातील पारनाका गावाजवळ असलेल्या के.एल.पोंडा ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थी दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास डहाणू व डहाणू जवळील समुद्रात सहलीसाठी गेलेल्या ३० ते ४० विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या बोटीला अपघात होऊन ती समुद्रात बुडाली व चार ते पाच विद्यार्थी समुद्रात बुडून मृत्यु पावल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पर्यटन व्यवसायासाठी सदर बोटीला परवाना नसणे तसेच मेरिटाईम बोर्डाकडून या बोटीला कोणत्याच प्रकारची परवानगी न घेता बोटीचे मालक महेंद्र अंभिरे हे व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, कोकणच्या समुद्रकिनाऱ्यावर मच्छीमार तसेच मालवाहतूक व पर्यटनाकरीता वापरल्या जाणाऱ्या सर्व बोटींची तपासणी व परवाना तपासणी मेरिटाईम बोर्डाचे अधिकारी प्रत्यक्ष जागेवर जाऊन न करता,

कार्यालयात बसून सही-शिक्के मारुन पैसे घेऊन करीत असल्याने अनेक बेकायदेशीर बोटी मासेमारी, माल वाहतूक व पर्यटनाकरीता वापर करीत असल्याच्या तक्रारी येऊनही त्याकडे संबंधित वरीष्ठ अधिकारी हेतूत: दुर्लक्ष करतात, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू अपघाताबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व तद्नुसार बोटीच्या मालकांविरुध्द, मेरिटाईम बोर्डाचे अधिकारी व महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच जखमी विद्यार्थी व मृत विद्यार्थींच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) होय,

(३) हे खरे नाही.

महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून प्रवासी / पर्यटक व माल वाहतूक बोटीची नोंदणी इनलॅण्ड व्हेसल ॲक्ट १९१७ अंतर्गत करण्यांत येते. बोटीची नोंदणी / सर्व्हे करण्याकरीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज प्राप्त झाल्यावर बोट ज्या ठिकाणी आहे त्याठिकाणी मेरीटाईम बोर्डाचे सर्व्हेअर यांचे मार्फत प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन बोटीचा सर्व्हे करण्यांत येतो. मासेमारी बोटीची नोंदणी मत्स्यव्यवसाय विभागाकडून करण्यात येते.

(४) पोलीस विभागाकडून बोटीचे चालक, मालक व खलाशी यांचेविरुध्द भा. दं. वि.सं. कलम ३०४(अ), २८० २८२ व ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सहाय्यक निधीतून अपघातात मृत्यू झालेल्या कुटुंबीयांना आर्थिक मदत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## किनवट (जि.नांदेड) सिरमेटी येथील शेतजमीन पडीक दाखवून सहायक संचालक नगर रचना नांदेड यांचेकडून निवासी अकृषक परवानगी घेतल्याबाबत

**(३२) * ११०१४८ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किनवट (जि.नांदेड) शहरापासून जवळच असलेल्या सिरमेटी येथील शेत भु.क ३/१ क्षेत्र ३ हे ५१ आर य मधीलचे क्षेत्र १ हे.ही शेत जमीन बारमाही (खरीप/रब्बीची) कास्त असतांना या क्षेत्रावर जमीन पडीक दाखवून सहायक संचालक नगर रचना नांदेड यांचेकडून निवासी अकृषक परवानगी घेण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त जमीन क्षेत्रावर निवासी प्रयोजनाकामी एन ए लेआउट प्रकरण मा.सहायक संचालक नगर रचना मुल्य निर्धारण विभाग, शाखा नांदेड यांचेकडे सादर करुन दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मंजूरी घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी दोषींविरुध्द कारवाई करणेबाबतची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी तहसिलदारांना निवेदन देऊन केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) बाबत अर्जदाराने अकृषिक परवानगीसाठी मूळ अर्ज दि.०२.०१.२०१६ रोजी सादर केला असुन त्यासोबत जोडलेल्या ७/१२ मध्ये सन २०१४-१५ या कालावधीत खरीप सोयाबिन अशी नोंद आहे. सदर कामी तलाठी सज्जा पिंपळगाव यांनी दि.०६.०२.२०१८ पत्रान्वये खरीप, ज्वारी, हरभरा, कापुस घेतले गेले असल्याची नोंद आहे, असे कळविले आहे.

विषयांकित क्षेत्र मौ. सिरमेटी या गावच्या गावठाणापासून ५०० मी. अंतराच्या आत असल्याने प्रादेशिक योजनेच्या विशेष विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुद क्र. २.५(७)(A) नुसार उक्त जागेत रहिवास वापर अनुज्ञेय होत असल्यामुळे उक्त तरतुदीमध्ये नमुद केल्याप्रमाणे ३०% अधिमुल्य व आवश्यक ते शुल्क आकारण्यात येवून दि.०७.०३.२०१७ पत्रान्वये सिमांकनाकरीता तात्पुरती तांत्रिक मंजुरीची शिफारस सहायक संचालक, नगर रचना, नांदेड यांच्या कार्यालयामार्फत करण्यात आली आहे. तदनंतर तहसिलदार किनवट यांनी दि. १६.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अंतिम मंजुरीबाबत सहायक संचालक, नगर रचना, नांदेड यांचा अभिप्राय अपेक्षिले असता त्यावर सहायक संचालक, नगर रचना, नांदेड यांनी दि. १६.१०.२०१७ रोजीच्या पत्रान्वये अंतिम मंजुरीची शिफारस केली आहे.

(३) व (४) संबंधित नाही.

(५) लागू नाही.

-----------------

## लोअर परळ (मुंबई) येथील कमला मिल कंपाऊंडमधील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' या दोन रेस्टोपबमध्ये लागलेल्या आगीत १४ जणांचा झालेला मृत्यू

**(३३) * १०४७६८ श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.वैभव नाईक (कुडाळ), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर),**

श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), ॲड.संजय धोटे (राजूरा), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.रमेश लटके (अंधेरी पूर्व), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), डॉ.राहूल पाटील (परभणी), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), ॲड.वारीस पठाण (भायखळा), श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड), श्री.प्रदीप नाईक (किनवट), श्री.संजय कदम (दापोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.बळीराम सिरसकार (बाळापूर), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम),

**श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लोअर परळ (मुंबई) येथील कमला मिल कंपाऊंडमधील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' हे दोन रेस्टोपब दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मध्यरात्री लागलेल्या भीषण आगीत जाळून भस्मसात झाले असून या भीषण दुर्घटनेत १४ निष्पाप जीवांचा गुदमरून मृत्यू झाला असून ५४ जण जखमी झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कमला मिल येथे लागलेल्या आगीत १४ जणांचा बळी गेल्यानंतर मुंबई महानगरपालिकेने बेकायदा हॉटेल, रेस्टॉरंट, पबवर धडक कारवाई करून ३५७ बेकायदा बांधकामे जमीनदोस्त केल्याचे माहे जानेवारी २०१८ च्या पहिल्या आठवड्यात वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर परिसराची जबाबदारी असलेल्या पालिकेच्या "जी उत्तर" विभागाच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गैरव्यवहार करून हॉटेल, पब, बार ॲण्ड रेस्टॉरंटला आवश्यक असलेले सर्व परवाने अवघ्या दहा दिवसात मिळवून देणारे रॅकेट महापालिकेच्या "जी उत्तर" विभागांतर्गत कार्यरत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कमला मिल भीषण आग दुर्घटनेच्या अनुषंगाने मुंबई महानगरपालिका आयुक्तांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना सादर केलेल्या अहवालामध्ये दोन सहाय्यक आयुक्तांना दोषी ठरवून त्यांची चौकशी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, कमला मील मधील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' या दोन रेस्टॉरंटमध्ये आग लागून या दोन्ही रेस्टारंटचे मालक दोषी असताना पोलीसांनी मात्र 'मोजोस ब्रिस्टो'च्या रेस्टॉरंटच्या मालकास पाठीशी घालून त्यास पळून जाण्यास मदत केल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, यासंपुर्ण प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार रेस्टॉरंटचे मालक, कमला मिलचे मालक, मुंबई महापालिकेचे अधिकारी, पोलीस अधिकारी व इतर अधिकारी जबाबदार असल्यास त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच सदर घटनेतील मृतांच्या

नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) लोअर परळ येथील कमला मिल कंपाऊंडमधील 'वन अबव्ह' आणि 'मोजोस ब्रिस्टो' या दोन रेस्टोपबमध्ये दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी लागलेल्या भीषण आगीत १४ जणांचा मृत्यु झाला असून, ५४ जण जखमी झाले आहेत व अग्निशमन दलाचा १ जवान जखमी झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) सदर अग्निकांडानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेने बेकायदा हॉटेल्स, रेस्टॉरंट व पबवर कारवाई करुन ४४० बेकायदा बांधकामे जमीनदोस्त केली आहेत.
(३) हॉटेल, पब, बार आणि रेस्टॉरंटला आवश्यक असलेले सर्व परवाने विहित नियमानुसार देण्यात येत असतात.

तथापि, असे परवाने १० दिवसांत मिळवून देणारे रॅकेट अस्तित्वात असल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या प्राथमिक चौकशी दरम्यान निदर्शनास आले नाही.
(४) सदर दुर्घटनेच्या अनुषंगाने आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीमध्ये दोन सहाय्यक आयुक्तांच्या कामकाजातील निदर्शनास आलेल्या पर्यवेक्षीय त्रुटी तसेच परवानापत्र जारी करण्यामध्ये झालेल्या अनियमितता पडताळण्याच्या दृष्टीने त्यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्यात येत आहे.
(५) सदर बाब खरी नसल्याचे पोलीस उपायुक्तांकडून कळविण्यात आले आहे.
(६) व (७) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने सदर आगीच्या दुर्घटनेची चौकशी केली असता, सदर आग "आगीचे उडते निखारे जळाऊ कापडाशी संपर्कात आल्यामुळे" व सदर आगीची सुरुवात ही "मोजोस बिस्ट्रो" रेस्टॉरंटमध्ये झाली असल्याचे निष्पन्न झाले.

सदर दुर्घटनेशी संबंधित मुंबई अग्निशमन दलाचे सहाय्यक विभागीय अग्निशमन अधिकारी यांना महानगरपालिकेच्या सेवेतून निलंबित करण्यात आले असून, एक केंद्र अधिकारी यांना ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाण्यामार्फत दिनांक २०.०१.२०१८ रोजी अटक झाल्यानंतर निलंबित करण्यात आले आहे.

सदर प्रकरणी ना.म. जोशी मार्ग पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. २९१/२०१८ कलम ३०४, ३३७, ३३८, २१६, २८५, १९७, १९८, ४७१, ४६६, ४६७, ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, १३ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी प्राथमिक चौकशी करुन अहवाल शासनास सादर केला आहे.

सदर चौकशी अहवालामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध खात्यांत कार्यरत असलेल्या एकूण १२ अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द खात्यांतर्गत सर्वंकष चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले असून, खात्यांतर्गत चौकशीची कार्यवाही करण्यात येत आहे.

सदर प्रकरणी अन्य कर्मचाऱ्यांचा सहभाग निश्चित करण्याच्या दृष्टीने पुढील तपास सुरु आहे.

सदर घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत देण्यात आलेली नाही.

-----------------

## मुंबईस्थित बेस्ट उपक्रमाने आयुर्मान संपुष्टात येत असलेल्या बसेस सेवेतून बाद करण्याचा घेतलेला निर्णय

**(३४) * १०६१७० श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईस्थित बेस्ट उपक्रमाने आयुर्मान संपुष्टात येत असलेल्या १५९ बसेस सेवेतून बाद करण्याचा निर्णय घेतला असल्याची बाब दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात बसेस बाद केल्याने नागरीकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बेस्ट उपक्रमाने आयुर्मान संपुष्टात येत असलेल्या १५९ बसगाडया मोडीत काढण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे.

(२) प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून बेस्ट उपक्रम १५९ बसगाडया टप्प्याटप्प्याने मोडीत काढणार आहे. अशा प्रकारे प्रवर्तनातून बस गाड्या रद्द करताना प्रवाशांची गैरसोय होणार नाही याकरीता बस सेवेचे फेरनियोजन करण्यात येते.

आयुर्मान संपलेल्या बसगाड्या प्रवर्तनातून रद्द करताना प्रवाशांची गैरसोय होणार नाही याची संपूर्ण काळजी घेण्यात आल्याचे बेस्ट प्रशासनाने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिल्लेगाव (जि.औरंगाबाद) पोलीस ठाण्याअंतर्गत घडलेल्या गुन्ह्यांचा तपास करण्याबाबत

**(३५) * ११०७१५ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिल्लेगाव (जि.औरंगाबाद) पोलीस ठाण्याअंतर्गत जुना मोंढ्यातील मुख्य भरवस्तीत राजूलबाइ पाटणी या वृध्देच्या हत्येची घटना नुकतीच घडली असतांना येथे राहणारे व्यापारी कैलास जाजू यांच्या घरावर चोरट्यांनी दरोडा टाकून त्यांचे वडील केशरचंद जाजू यांचा निर्घृण खून केला असल्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचबरोबर चोरट्यांनी रुपये २८ लाख ८० हजारांचा ऐवज चोरला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या गुन्ह्याचा तपास करुन आरोपीवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर परीसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

दि.१४/११/२०१७ रोजी अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश करुन केशरचंद जाजू यांना गंभीर मारहाण करुन ठार मारले. परंतु, दरोडा पडल्याचे तपासात निष्पन्न झाले नाही.

(२) हे खरे आहे.

सदर घटनेत अज्ञात चोरट्यांनी तिजोरीतील ९० तोळे सोन्याचे दागीने, ५ किलो चांदीचे दागीने व अडीच लाख रुपये रोख रक्कम असा एकूण २८,८०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल चोरुन नेला आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस स्टेशन, शिल्लेगाव ता. गंगापूर येथे दि.१४/११/२०१७ रोजी गु.र.नं. ३५२/२०१७ भा.दं.वि. कलम ३०२, ४६० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्ह्याचा तपास चालु आहे.

सदर परिसरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी त्या परिसरात रात्रगस्त पेट्रोलिंग मध्ये वाढ करण्यात आलेली आहे. तसेच, पोलीस मुख्यालय येथून रात्रगस्तीसाठी अतिरीक्त पोलीस कर्मचारी देण्यात आले आहेत.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा बसविण्याबाबत

**(३६) * १०४८०१ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संजय पोतनीस (कलिना), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेची ४ मोठी वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये, १ दंत रुग्णालय, ६ विशेष रुग्णालये, १६ सामान्य रुग्णालये, २९ प्रसूतीगृहे आणि १७५ दवाखाने असून या रुग्णालयात अग्निसुरक्षा यंत्रणाच बसविण्यात आलेल्या नाहीत, परिणामी त्या इमारतींना अग्निशमन दलाने ना हरकत प्रमाणपत्र दिले नसल्याची बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकीकडे पालिकेने मुंबईतील इमारती, व्यावसायिक कार्यालये आणि आस्थापनांना अग्निप्रतिबंधक यंत्रणा बसविणे सक्तीचे केले तसेच उपाययोजना न केल्यास कारवाईचा इशारा देण्यात आला असताना तथापि महानगरपालिकेने पालिका रुग्णालयांना सदर नियम लावण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, पालिकेच्या रुग्णालयात, दवाखान्यात तसेच इतर ठिकाणी अग्निसुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यात आलेल्या नसल्याने त्यांना अग्निशमन दलाने ना हरकत प्रमाणपत्रही दिलेले नाही, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तद्नुसार पालिकेकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे व उपरोक्त ठिकाणी अग्निसुरक्षा यंत्रणा कधीपर्यंत बसविण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कुपर आणि नायर दंत रुग्णालयास अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, के.ई.एम., नायर वैद्यकीय महाविद्यालय आणि सायन रुग्णालयात अग्निसुरक्षा यंत्रणा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे.

- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १६ उपनगरीय रुग्णालयांपैकी ३ रुग्णालयांना अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त आहेत.
- १२ रुग्णालयांनी ना-हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे व अग्निशमन दलाने निदर्शनास आणलेल्या त्रुटींची पूर्तता संबंधित रुग्णालयांकडून करण्यात येत आहे.
- एका रुग्णालयाचे दुरुस्तीचे काम सुरु असून, दुरुस्तीनंतर ना-हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्यात येणार आहे.

तसेच, राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर रुग्णालयांमध्ये आवश्यक त्या बाबींची पूर्तता करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीतील २९ प्रसुतीगृहे, १७५ दवाखाने व ५ विशेष रुग्णालयांना पुरेशा प्रमाणात अग्निसुरक्षा यंत्रे उपलब्ध आहेत.

(२) ज्या ठिकाणी गॅस सिलेंडर, डिझेल, केरोसीन इत्यादींचा वापर करुन खाद्यपदार्थ तयार केले जातात अशा आस्थापना, व्यवसाय यांना माहे डिसेंबर, २०१७ मध्ये मुंबई अग्निशमन दलाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसारित केलेल्या संहिताबध्द अटींची ३० दिवसांची पुर्तता करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच, अन्य आस्थापनांनी विकास नियंत्रण नियमावली १९९१, राष्ट्रीय इमारत संहिता २०१६ महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार अग्निसुरक्षा/अग्निप्रतिबंधक यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत चौकशी करण्यात आलेली नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५ प्रमुख रुग्णालयांसह ५ विशेष रुग्णालये, १६ उपनगरीय रुग्णालये व २९ प्रसुतीगृहांमध्ये अग्निसुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आल्या आहेत.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी रुग्णालयीन सुरक्षेसाठीच्या सन २०१६ मध्ये प्रसारित मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांच्या अग्निसुरक्षेसंदर्भात रुग्णालयीन स्तरावर आवश्यक त्या बाबींची पुर्तता करण्यात आली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ५ प्रमुख रुग्णालयांच्या इमारतीस आग लागण्याचे संभाव्य धोके लक्षात घेता, त्वरीत प्रतिसादाकरिता रंगीत तालीम, कर्मचाऱ्यांकरिता जाणीव जागृतीचे विशेष कार्यक्रम हे सहाय्यक अग्निशमन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रुग्णालय आपत्कालीन समितीद्वारे करण्याची योजना कार्यान्वित आहे.

-----------------

## अहमदनगर येथे रेशनिंग धान्याची तस्करी करणाऱ्यांना अटक केल्याबाबत

**(३७) * १०६९४३ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर येथे नगर कृषी उत्पन्न बाजार समितीचे बनावट मुख्यपत्रावर (लेटरहेड) खोटा शिक्का वापरुन रेशनिंगचा साडेनऊ टन गहू (सुमारे रुपये ५ लाखाचा गहू) कायनेटीक चौक येथे दिनांक १० जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास कोतवाली पोलिसांनी पकडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलिसांनी या रेशनिंग धान्याची तस्करी करणाऱ्यांना अटक करून त्यांच्याविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

दिनांक ०९.०१.२०१८ रोजी ९५०० किलो सुमारे रुपये १,९२,७८०/- किंमतीचा रेशनिंग सदृश्य गहू कायनेटिक चौक, अहमदनगर येथे कोतवाली पोलीसांनी पकडला असून कोतवाली पोलीस स्टेशन अहमदनगर येथे गु.र.नं.॥ ४/२०१८ जिवनावश्यक वस्तु अधिनियम सन १९५५, कलम ३,७ सह भा.द.वि. कलम ४२०,४६८,४७१,४७६ अन्वये दिनांक ०९.०१.२०१८ रोजी पुरवठा निरीक्षक माळीवाडा, अन्नधान्य वितरण अधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्यामार्फत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित ट्रक चालक यांना अटक करण्यात आली.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील पवई येथे आयआयटी गेटसमोर मॅनहोलचे काम सुरु असताना ३ कामगारांचा झालेला मृत्यू

**(३८) * १०७०४५ श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा),**

**प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील पवई येथे आयआयटी गेटसमोर मॅनहोलचे काम सुरु असताना कप्पीचा हूक तुटल्यामुळे क्रेन कोसळून झालेल्या दुर्घटनेत ३ कामगारांचा मृत्यू व २ कामगार जखमी झाले असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर सदोष यंत्रणा उभारणाऱ्या ठेकेदारावर कारवाई तसेच या घटनेतील मृत्यू व जखमींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) मुंबईतील पवई येथे आयआयटी गेटसमोरील मॅनहोलच्या कामाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नियुक्त कंत्राटदाराची क्रेन कोसळून दिनांक ०१.०१.२०१८ रोजी झालेल्या दुर्घटनेत ४ कामगारांचा मृत्यु झाला असून १ कामगार जखमी झाला आहे ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर घटनेची कामगार आयुक्त यांचेमार्फत चौकशी सुरु आहे.

सदर प्रकरणी क्रेन चालकाविरुध्द पवई पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ०२/२०१८ अन्वये भा.द.वि. कलम ३०४(अ), ३३८, ३४ नुसार दिनांक ०२.०१.२०१८ रोजी एफ.आय.आर. दाखल करण्यात आला आहे.

तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत कंत्राटदारांविरुध्द पवई पोलीस ठाणे येथे दिनांक ३१.०१.२०१८ रोजी स्वतंत्र तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(३) सदर प्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत मे. मिशीगन इंजिनियर्स प्रा. लि. व मे. आर. पी. एस. इन्फ्राप्रोजेक्ट प्रा.लि. या कंत्राटदारांविरुध्द खालीलप्रमाणे कारवाई करण्यात आली आहे:-

• सदर कंत्राटदारांस प्राथमिक दंडात्मक कारवाई अंतर्गत दिनांक ०२.०१.२०१८ रोजी रु. ४ लाख इतका दंड ठोठावण्यात आला आहे.

• सदर कंत्राटदारांस दिनांक ०३.०१.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

दिनांक ०३.०१.२०१८ रोजी कामगार अधिकारी यांचेमार्फत दिलेल्या मनाई आदेशानुसार काम थांबविण्यात आले आहे.

सदर घटनेतील ४ मृत कामगाराच्या कुटुंबियांना प्रत्येकी रु. ६०,०००/- इतकी तातडीची आर्थिक मदत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आली आहे.

तसेच, अंतरिम नुकसान भरपाईच्या दाव्याची पुर्तता करण्यासाठी आगाऊ रक्कम म्हणून प्रत्येकी रु. ५०,०००/- चे धनादेश कंत्राटदारामार्फत श्रमिक नुकसान भरपाई आयुक्त यांच्याकडे जमा करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गिरणी कामगारांच्या मागण्यांबाबत

**(३९) * १०७२०७ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडहिंग्लज (जि.कोल्हापूर) तालुक्यातील गिरणी कामगारांनी त्यांच्या न्याय मागण्याबाबत दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास प्रांताधिकारी, गडहिंग्लज यांच्या कार्यालयावर मोर्चा काढून त्यांना निवेदन दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गिरणी कामगारांनी दिलेल्या निवेदनाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.
(२) गिरणी कामगार व त्यांच्या वारसदाराना घरे देवून पुनवर्सन करण्याचा कालबध्द कार्यक्रम सरकारने जाहिर करणे, एन.टी.सी.च्या गिरण्यांची जागा सरकारने घेवून गिरणी कामगारांच्या घरासाठी वापरावी, गिरणी कामगारांच्या घराचा खर्च विकासकाकडून वसुल करावा, गिरणी कामगार व त्यांच्या वारसदारांना मुंबईत घरे देवून पुनर्वसन करावे, त्यांना मुंबईबाहेर घरे देण्याचे सरकारने रद्द करावे, गिरणी कामगार अथवा त्यांच्या मुलाना गिरण्यात तयार होणा-या उद्योगात रोजगार मिळावा अशा प्रमुख मागण्या आहेत.
(३) व (४) सर्व गिरणी कामगारांना बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये सदनिका देणे शक्य होणार नसल्याने सदनिकांसाठी इतरत्र जागा उपलब्ध करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील भाडे तत्वावरील सदनिका गिरणी कामगारांना देणेचा निर्णय घेणेत आलेला आहे. त्यानुसार एकंदर ११,५५९ सदनिका उपलब्ध होणार आहेत. त्यापैकी २४१७ सदनिकांची सोडत दिनांक २.१२.२०१६ रोजी काढलेली आहे. प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर असल्याने उर्वरित ९१४२ सदनिका जून २०१९ पर्यंत टप्प्याटप्प्याने उपलब्ध होणार आहेत.

गिरणी कामगारांसाठी जास्तीत जास्त जमीन उपलब्ध होणेसाठी बृहन्मुंबईतील गिरण्यांच्या मोकळ्या क्षेत्राचे १/३ प्रमाणे वाटपाऐवजी गिरण्यांच्या संपूर्ण भूखंडाचे १/३ प्रमाणे वाटप व्हावे याकरिता विनियम ५८ मध्ये सुधारणा प्रस्तावित केलेल्या आहेत. यासंदर्भाने नागरिकांच्या सूचना/हरकती मागविणारी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७(१अेअे)

खालील सूचना दिनांक ७.७.२०१७ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही सुरु आहे.

गिरणी कामगारांच्या सदनिकांची किंमत ठरविणे तसेच त्यांचे वितरण याबाबत मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत असून त्यामध्ये गिरणी कामगार संघटनेचे प्रतिनिधीही सदस्य आहेत. सदर समितीची मागील बैठक दिनांक ६.१०.२०१७ रोजी झालेली आहे. समितीने गिरणी कामगारांना जास्तीत जास्त सदनिका उपलब्ध करणेसाठी निर्णय घेवून सर्व विभागांना त्याप्रमाणे कार्यवाहीच्या सूचना दिलेल्या आहेत.

बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या विनियम ५८ मध्ये, गिरण्यांच्या जागेचा औद्योगिक व वाणिज्य कारणासाठी विकास/पुनर्विकास होत असेल तर दिनांक १ जानेवारी २००० रोजी कामावर असलेल्या गिरणी कामगारांच्या कुटुंबामधील एका सदस्यास जर तो आवश्यक अर्हता धारण करीत असेल तर प्राधान्याने नोकरी देणेची तरतूद यापूर्वीच करणेत आलेली आहे.

-----------------

## नवी मुंबईतील पनवेल गावातील ६६ कुळांना फसवून मुंदडा नावाच्या जमिनदाराला मोक्याचा भूखंड दिल्याबाबत

**(४०) * १०७५४३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिडकोने वाघिवली (पनवेल) गावातील ६६ कुळांना फसवून शासनाच्या नियमानुसार जमीनदार आणि सावकारांना साडेबारा टक्के योजनेतील भूखंड देता

येत नसतानाही मुंदडा नावाच्या जमिनदाराला नवी मुंबईतील मोक्याचा ५३ चौ.मी. चा भूखंड दिल्याचे माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच भूसंपादन पनवेलच्या वाघिवली गावात झाले असतांनाही अधिकाऱ्यांनी प्लॉट बेलापूरमध्ये दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबधित अधिका-यांवर व जमिनदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मूळ जमिनधारक श्री.जुगलकिशोर हनुमानबक्ष मुंदरा व इतर यांच्याकडून मौजे वाघिवली, ता.पनवेल, जि.रायगड येथील सर्व्हे क्र.१८२ मधील ६०-८३-८ हे.आर. जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी दि.३/२/१९७० च्या अधिसूचने नुसार संपादित करण्यात आली होती. उक्त जमिनींच्या कुळांनी जमीन विकत घेण्याचे नाकारल्याने अतिरिक्त मामलेदार, पनवेल नं-१ यांच्या दि.१६/८/१९६२ रोजीच्या आदेशानुसार सदर सर्व्हे नंबरमधील कुळांची नावे कमी करण्यात आली असल्याचे फेरफार क्र.१३७, दि.२९/१२/१९६४ वरुन आढळून आले आहे.

परिणामी, सदर संपादित जमिनीपोटी भूसंपादन अधिनियमानुसार भूसंपादन अधिकारी, रायगड यांचे मार्फत दि.२३/१२/२००२ रोजी जाहीर झालेल्या अंतिम निवाडा क्र.२/९५ नुसार मूळ जमिनधारक यांना १२.५ टक्के योजनेअंतर्गत भूखंड वाटपासाठी पात्र ठरविण्यात आल्यानंतर सिडको महामंडळाने सी.बी.डी. बेलापूर येथील से.क्र.३०/३१ मधील ५३,२०० चौ.मी. भूखंडाचे “जसे आहे तसे” या तत्वावर वाटप केलेले आहे.

(२) सदर प्रकरणी संपादित जमिनीपोटी १२.५ टक्के योजनेनुसार संबंधीत भूधारकास भूखंड वाटप करण्याच्या अनुषंगाने स्थापन केलेल्या लिंकेज समितीने, संपादित जमीन पनवेल तालुक्यातील असली तरी तेथील मोकळ्या भूखंडाचे मुल्य अधिक असल्याने वाघिवली गावातील लोकांच्या दैनंदिन व्यवहारासाठी बेलापूर हे गांव सोईस्कर असल्याने १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड वाटपासाठी पूर्वीच राखून ठेवलेल्या सेक्टर क्र. ३०/३१ मध्ये अविकसीत ठिकाणी

“जसे आहे तसे” या तत्त्वावर भूखंड वाटप करण्याचा निर्णय घेतला व त्यानुसार दि.१६/६/२००८ व दि.५/९/२००८ अन्वये भूखंडाचे वाटप करण्यात आल्याचे महामंडळाने नमूद केले आहे.

(३) सदर प्रकरणी १२.५ टक्के योजनेतंर्गत वाटप केलेल्या भूखंडांचे मूल्य संपादित जमिनीच्या मूल्यापेक्षा अधिक असल्याचे आढळून आल्याने सदरहू भूखंड वाटप रद्द करुन भूधारकास पर्यायी जमीन देण्याबाबत शासनाने दि.१४/७/२०१० रोजी दिलेल्या निदेशानुसार सिडकोने दि.२९/१०/२०१० रोजी भूखंड वाटप रद्द केले.

तथापि, याबाबत विकासकाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्र.१०१६३/२०१० मध्ये मा.न्यायालयाने दि.१४/३/२०१२ रोजीच्या निर्णयान्वये शासनाचे दि.१४/७/२०१० रोजीचे आदेश रद्दबातल ठरवून याचिका निकाली काढली. त्यानंतर सिडकोने ऑक्टोबर, २०१४ मध्ये भूधारक व विकासक यांना भूखंड वाटप रद्द का करण्यात येवू नये याबाबत दि.९/९/२०१४ व दि.२३/९/२०१४ रोजी कारणे दाखवा व दि.२९/१/२०१६ रोजी पुरवणी कारणे दाखवा नोटीस बजावली.

या नोटीसीविरोधात विकासकाने मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या ९२१२/२०१४ या याचिकेवर मा.न्यायालयाने दि.८/१०/२०१४ च्या अंतरीम आदेशान्वये कठोर कार्यवाही न करण्याचे आदेश दिले असून सदर याचिका अद्यापि प्रलंबित आहे. तद्नंतर सिडको महामंडळाकडून उक्त प्रकरणी छाननीअंती यापुर्वी बजावण्यात आलेली नोटीस व पुरवणी कारणे दाखवा नोटीस दि.८/६/२०१६ रोजी मागे घेण्यात आली.

सन २०१७ च्या हिवाळी अधिवेशनात उपस्थित लक्षवेधी सूचनेवर दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने शासनाने दि.२२/१२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सिडकोच्या उक्त दि.८/६/२०१६ च्या पत्रास स्थगिती देवून याप्रकरणी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. याबाबत सिडको महामंडळाकडून दि.१९/१/२०१८ अन्वये सादर करण्यात आलेल्या अहवालावर कार्यवाही करण्याचे प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागास थकित असलेली अनुदानाची रक्कम शालेय शिक्षण विभागाकडून मिळण्याबाबत

**(४१) * १०४८१८ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला दरवर्षी अनुदान देणे अनिवार्य आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत १७ वर्षापासून राज्य शासनाकडे थकीत असलेली अनुदानाची २१८८ कोटी रुपयांची रक्कम मिळावी यासाठी महानगरपालिकेने शासनाकडे पाठपुरावा करुनही अनुदानाची रक्कम अद्याप देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर थकीत रक्कम अद्यापपर्यंत न देण्याची कारणे काय आहेत वा थकीत अनुदानाची रक्कम महानगरपालिकेला अदा करण्याच्या अनुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षणासाठी शालेय शिक्षण विभागाच्या दिनांक ०३.०३.१९७६ व दिनांक १७.१२.१९९४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रत्यक्ष खर्चाच्या ५०% इतकी रक्कम अनुज्ञेय आहे.

त्यानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेस शालेय शिक्षण विभागाकडून सन २०१६-१७ पर्यंत चौथ्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदान प्राप्त होत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने शालेय शिक्षण विभागाकडे प्राथमिक शिक्षणासाठी सन २००५ पर्यंत पाचव्या व सन २००६ नंतर सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन अनुदानाची मागणी सादर केली आहे.

तथापि, बृहन्मुंबई महानगरपालिका प्राथमिक शिक्षण विभागातील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पाचव्या व सहाव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी लागू करण्याबाबत निर्णय झाल्यानंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे शालेय शिक्षण विभागाकडून कळविण्यात आले आहे.

-----------------

## बोरिवली (मुंबई) येथील साईबाबा नगर येथे चॅरीटेबल ट्रस्टने बेकायदा जिमखान्याचे बांधकाम केल्याबाबत

**(४२) * १०५२९४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील साईबाबा नगर, बोरीवली येथील भूखंडावर आदि गणेश चॅरिटेबल ट्रस्ट कडून बेकायदेशीर, विनापरवानगीने तसेच अनधिकृतपणे जिमखाना बांधण्यात आल्याची तक्रार स्थानिक नागरिक श्री.रोजी अब्राहम यांनी दिनांक २५ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व लोकायुक्ताकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका व म्हाडा प्रशासनाने बेकायदा घेतलेला भूखंड त्वरीत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात यावा अशी नोटीस बजावण्यात आली असतानांही सदर भूखंड महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला नाही, हे खरे ही आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीअंती दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अशा आशयाची दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजीची तक्रार प्राप्त झाली आहे ही वस्तुस्थिती आहे.
(२) हे खरे आहे.
(३), (४) व (५) मे. आदि गणेश चॅरिटेबल ट्रस्ट यांचेकडून सदर भूखंड ताब्यात घेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे:-

- सदर बांधकामाचा ताबा का घेण्यात येऊ नये याबाबत सदर संस्थेस दिनांक ०५.०१.२०१७ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे.
- सदर नोटीशीच्या अनुषंगाने, मे. आदि गणेश ट्रस्ट यांनी करार करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बाबींची पुर्तता करण्याबाबत तयारी दर्शविली.
- सदर खुलासा अमान्य करुन सदर भूखंडावरील बांधकाम तात्काळ महानगरपालिकेच्या ताब्यात देण्याबाबत तसेच, सदर बांधकाम ताब्यात न दिल्यास मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८/महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम/फौजदारी कारवाई करण्यात येईल असे मे. आदि गणेश चॅरिटेबल ट्रस्ट यांना दिनांक ०१.०१.२०१८ रोजीच्या नोटीशीन्वये कळविण्यात आले आहे.

-----------------

## पुणे शहरासह राज्यात घनकचरा प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र पर्यावरण प्राधिकरणाची स्थापना करण्याबाबत

**(४३) * १०८६३२ श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरात ५ टन क्षमतेच्या २५ घनकचरा प्रकल्पातून बायोगॅस व वीजनिर्मितीसाठी प्रकल्प उभारले गेले, मात्र कचऱ्यापासून वीज व बायोगॅस निर्मितीचे प्रयोग अनेकदा अयशस्वी झालेले असतानाही पुन्हा पुन्हा नव्याने प्रकल्प उभारण्यासाठी कोट्यवधी रुपयाचा खर्च करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील १०० टनांचा दिशाप्रकल्प व १००० टन कचरा विघटन क्षमतेचा हंजर प्रकल्प बंद असल्यामुळे तसेच कात्रज, वडगाव, पेशवेपार्क, बाणेर, घोलेरोड, येरवडा इत्यादी भागातील बायोगॅस व वीजनिर्मीतीचे अनेक प्रकल्प बंद पडल्याने सदर प्रकल्पावर खर्च करण्यात आलेल्या कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कचऱ्याचे विघटनापासून बायोगॅस,इंधन,वायू,बांधकाम साहित्य,रस्ते इत्यादी नव्या तत्रंज्ञानाचा वापर करण्याबाबत पर्यावरण विभागाने सक्षम यंत्रणा उभारली आहे काय,
(४) असल्यास, पुणे शहरासह राज्यातील घनकचरा प्रश्न सोडविण्यासाठी स्वतंत्र पर्यावरण प्राधिकरणाची स्थापना शासन करणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१), (२), (३) व (४) • पुणे शहरात ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी एकूण २५ बायोगॅस प्रकल्प उभारण्यात आले असून त्यापैकी २० प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत.

• उर्वरित प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांच्या निविदा धारकांची मुदत संपूष्टात आली असल्याने फेरनिविदा प्रक्रिया सुरू आहे. तसेच २ प्रकल्प तांत्रिक कारणांमुळे बंद आहेत.

• दिशा प्रकल्प सन २०१३ पासून सन २०१५ पर्यंत कार्यान्वित होता. तथापि, स्थानिकांच्या विरोधामुळे व मा.उच्च न्यायालयातील प्रकरणांमुळे सदर प्रकल्प बंद अवस्थेत आहे.

• तसेच हंजर प्रकल्प हा सन २०१० ते सन २०१३ पर्यंत कार्यान्वित राहिला असून त्या दरम्यान प्रकल्पाच्या क्षमतेनुसार प्रक्रिया करण्यात आली आहे. तद्नंतर सदर प्रकरण कार्यक्षमतेने सुरू नसल्याने बंद करण्यात आला आहे.

• वडगांव, घोलेरोड, येरवडा येथील बायोगॅस प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित असून कात्रज व पेशवेपार्क बायोगॅस प्रकल्प फेरनिविदेच्या प्रक्रियेत आहेत.

• बाणेर बायोगॅस प्रकल्पाचे तांत्रिक दुरूस्तीचे काम सुरू असून प्रकल्प लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहे.

• त्यामुळे या प्रकल्पावर खर्च झालेल्या कोट्यावधी रूपयांचे नुकसान झाले ही वस्तुस्थिती नाही.

• घनकचरा व्यवस्थापन नियमासंदर्भात तरतूदींची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ विहित प्राधिकरण असून स्वतंत्र पर्यावरण प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर परिसरातील बेसा व बेलतरोडी परिसरातील अवैध बांधकाम करणाऱ्या विकासकांना एमएमआरडीएने नोटीस दिल्याबाबत

**(४४) * १०५९४६ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर परिसरात मोठया प्रमाणात अवैध बांधकाम सुरू असल्याची माहिती एमएमआरडीएचे आयुक्तांना मिळताच त्यांनी बेसा व बेलतरोडी परिसरातील अवैध बांधकाम सुरू असलेल्या इमारतीची माहिती सॅटेलाईट पध्दतीने गोळा करून ८३३ अवैध बांधकाम करणाऱ्या विकासक व इतरांना नोटीस पाठवून कार्यवाही सुरू केली असल्याचे दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी नागपूर येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८३३ अवैध बांधकाम करणाऱ्या विकासकांना केवळ नोटीस देण्यात आली असून त्यांच्याविरुध्द कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर परिसरात मोठया प्रमाणात अवैध बांधकाम केले असून लाखो रूपयांना एक एक सदनिका विकून लोकांची करोडो रूपयांची फसवणूक केल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) बेसा व बेलतरोडी मधील १८० बांधकामास नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून नोटीस देण्यात आल्या आहेत.
(२) दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजी प्रशमीत संरचना म्हणून बांधकामे नियमानुकूल करण्याबाबतचे नियम मंजूर केलेले आहेत. या नियमानुसार बांधकाम प्रशमीत करण्यास इच्छूक असल्यास, बांधकामे नियमानुकूल करण्याची मुभा आहे. बेसा व बेलतरोडी परिसरातील १८० बांधकामांपैकी ५८ प्रकरणात शासनाच्या दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या उक्त निर्णयाप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले आहेत व त्यामध्ये सदरहू शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही सुरु आहे. तसेच उर्वरित १२२ प्रकरणांपैकी २० प्रकरणात संबंधित पक्षकारांनी त्यांचे लेखी स्पष्टीकरण सादर केलेले आहे. उर्वरित प्रकरणामध्ये लेखी स्पष्टीकरण अद्याप अप्राप्त आहे. विहित मुदतीत स्पष्टीकरण प्राप्त न झाल्यास किंवा प्राप्त स्पष्टीकरण असमाधानकारक असल्यास, एमआरटीपी ॲक्ट, १९६६ मधील कलम ५३ प्रमाणे प्रकरणनिहाय यथोचित कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.
(३) सदर विषयाच्या अनुषंगाने कार्यालयीन अभिलेख पडताळले असता, अशाप्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.
(४) व (५) तक्रार प्राप्त न झाल्यामुळे चौकशी करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील घाटकोपर येथे म्हाडाच्या दलित वस्ती योजनेच्या कामात झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(४५) * १०५११९ ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय केळकर (ठाणे), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील रमाबाई नगर, घाटकोपर येथे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत ५०० शौचालये उभारण्याचे उद्दिष्ट म्हाडा तर्फे ठरविण्यात आले होते, परंतु प्रत्यक्षात ३१८ शौचालये मंडळाने उभारली असल्याचे माहे जानेवारी २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या शौचालय निर्मितीच्या कामात गैरव्यवहार झाला असल्याचे भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या २०१३ च्या अहवालात निदर्शनास आले आहे, तसेच उभारण्यात आलेल्या शौचालयाची कामे वाढल्याने सुमारे २०० कोटी रुपये अतिरिक्त खर्च झाल्याचे कॅग ने अहवालात नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याप्रकरणी म्हाडाच्या झोपडपट्टी सुधार मंडळातील संबधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्याचे आदेश दिले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, असल्यास, त्यात काय आढळून आले आहे तद्नुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) रमाबाई आंबेडकर नगर आणि कामराज नगर, घाटकोपर येथील गलिच्छ वस्त्यांमध्ये मंजूर ५१० पैकी ३१५ शौचालये बांधण्यात आली आहेत. याबाबत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२-१३ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालात आक्षेप नमूद करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही, ५१० शौचालये बांधण्याच्या प्रस्तावास रु.५ कोटी १० लक्ष इतक्या रक्कमेस तांत्रिक मंजूरी देण्यात आली होती, असे म्हाडाने कळविले आहे. महालेखापरीक्षकांच्या अहवालात, उपरोक्त वस्तीत तद्नंतर बांधलेल्या ३८ शौचालयाचे काम पहिल्या कामाबरोबर सलंग्न केले असते तर रु.२३.३९ लाख इतकी बचत झाली असती, असे नमूद केले होते व त्या अनुषंगाने लोकलेखा समितीने त्यांच्या २४ व्या अहवालात कामाच्या कार्यान्वयाचे अयोग्य नियोजन झाल्याबद्दल या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याचे निर्देश दिले होते.

(३) लोकलेखा समितीच्या २४ व्या अहवालातील शिफारसी विचारात घेऊन, शासनाच्या दि.१६.१२.२०१७ च्या पत्रान्वये सदर प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना या प्रकरणी चौकशी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.
(४) अद्याप सदर अहवाल प्राप्त झालेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खर्डी (जि.ठाणे) येथे वेलनेस सिटीच्या नावाने मुबंईतील ग्राहकांची झालेली फसवणूक

**(४६) * १०७५४७ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खर्डी (जि.ठाणे) येथे वेलनेस सिटीच्या नावाने मुबंईतील ३०० ग्राहकांना फसविल्याप्रकरणी शहापूर पोलिस ठाण्यामध्ये दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तक्रार दाखल करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित विकासकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

परंतु, अर्जदार श्री.विजय जोशी यांनी दिशा डायरेक्ट मार्केटिंग व श्रीकृष्ण कन्स्टुवेल प्रा. लि. यांचेकडून फ्लॅट खरेदी करतेवेळी झालेल्या करारात नमुद सोई-सुविधा न पुरविल्यामुळे मा. प्रथम वर्ग न्यायालय, शहापुर येथे दावा दाखल केला आहे.
(२) व (३) सदर प्रकरणी मा.प्रथम वर्ग न्यायालय, शहापुर येथे दाखल रेगुलर केस क्र. ६५/२०१७ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ३४ बाबत फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०२ प्रमाणे अहवाल सादर करण्यास आदेशित केले होते. त्यानुसार, सदर प्रकरणी अर्जदार व इतर १२ जणांच्या जबाबानुसार व केलेल्या

सविस्तर चौकशीनुसार शहापुर पोलीस ठाणे यांचेकडुन दि. १३.०२.२०१८ रोजी पुढील कार्यवाही करिता मा.न्यायालयात अहवाल सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील लालबाग येथील बदानी बोहरी चाळींचा पुनर्विकास करताना म्हाडाला मिळालेल्या ६८ सदनिकांच्या वाटपाबाबत

**(४७) * १०४८२१ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लालबाग (दक्षिण मुंबई) परिसरातील गोदरेज कंपाऊंडमधील बदानी बोहरी चाळीचा पुनर्विकास करुन बांधण्यात आलेल्या २२ मजल्याच्या टॉवरमधील १५६ सदनिकांपैकी मूळ रहिवाश्यांच्या ८८ सदनिका वगळून उर्वरित ६८ सदनिका म्हाडाला मिळाल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, म्हाडाला मिळालेल्या ६८ सदनिकांचे वाटप लॉटरी पध्दतीने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी करण्याचा निर्णय म्हाडाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासानंतर म्हाडाला मिळणाऱ्या अतिरिक्त घरांचे वितरण म्हाडाच्या मास्टरलिस्टमध्ये प्रतिक्षेत असलेल्या अर्जदारांना म्हाडा करते, असे असताना देखील लॉटरीनुसार आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी घरे उपलब्ध करुन देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर पुनर्विकास प्रकल्पाबाबत म्हाडाच्या प्रशासकीय मान्यता आदेशपत्रात असे नमूद केले आहे की, सदरहु पुनर्विकास योजना प्राधिकरण निधी (लेखाशिर्ष १६०) घेण्याचे प्रस्तावित असल्यामुळे योजनेसाठी लागणारा निधी उभारण्यासाठी योजनेची जाहिरात देऊन व नियमानुसार लाभधारक निश्चित करुन त्यांच्याकडून रक्कम वसुल करण्यात यावी. यासाठी कॅश इन फ्लोचे वेळापत्रक

आखावे व कॅश इन फ्लोनुसार वसुल करावी, त्यानुसार प्रशासकीय मान्यता आदेशपत्रातील अटी व शर्तीच्या अधिन राहून सदर पुनर्विकास योजनेस म्हाडाने मंजुरी दिलेली आहे. याकारणास्तव मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळास मिळणाऱ्या ६८ सदनिकांचे व ०१ दुकानांचे वाटप हे लॉटरी पध्दतीने करुन त्यातून मिळणाऱ्या निधीतून योजनेवर झालेल्या खर्चाची परिपुर्तता करण्यात येणार आहे, त्यामुळे या योजनेतून म्हाडाला मिळणाऱ्या अतिरीक्त ६८ सदनिका बृहतसुचीवर देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## टेमघर (भिवंडी) येथील सोनादेवी कंपाऊंडमध्ये असलेली जुगाई टेक्सटाईल्स प्रोसेस रॉयल डाईंग कंपनी बंद झाल्याबाबत

**(४८) * १०७५५३ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) टेमघर (ता.भिवंडी, जि.ठाणे) येथील सोनादेवी कंपाऊंडमध्ये असलेल्या जुगाई टेक्सटाईल्स प्रोसेस रॉयल डाईंग या कंपनीने कामगारांना कोणतीही पूर्वसूचना न देता माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पासून कंपनी अचानक बंद केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनी अचानकपणे बंद करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या कंपनीतील कामगारांना त्यांची देय असलेली देणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर :** (१) व (२) मे.जुगाई टेक्सटाईल्स प्रोसेस यांनी मे.रॉयल टेक्सटाईल्स प्रोसेसेर्स यांच्याकडून दि.१ सप्टेंबर, २०१७ ते ३१ ऑगस्ट २०२० या कालावधीकरिता कंपनी भाडेतत्वावर चालविण्यास घेतली होती. तथापि, माहे ऑक्टोबर, २०१७ या महिन्याचे विद्युत बिल न भरल्याने दि.२८/११/२०१७ रोजी कंपनीचा विद्युत पुरवठा खंडित केल्याने दि.२८/११/२०१७ पासून दिनांक २४/१२/२०१७ या कालावधीत उत्पादन प्रक्रिया बंद झाली होती.त्यानंतर मे.रॉयल टेक्सटाईल्स प्रोसेसर्स यांनी थकीत बिल भरुन दि.२४/१२/२०१७ रोजी पासून कंपनीचे उत्पादन चालु केले आहे. सद्यस्थितीत कंपनी चालू आहे.

(३) मे.जुगाई टेक्स्टाईल प्रोसेस या कंपनीविरुध्द वेतन प्रदान अधिनियम, १९३६ अंतर्गत निरीक्षणाअंती आढळून आलेल्या उल्लंघनाबाबत मा.प्रथम न्यायदंडाधिकारी, भिवंडी यांच्या कोर्टात दिनांक ०७/०२/२०१८ रोजी खटला दाखल करण्यात आलेला आहे.

माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०१७ या दोन महिन्याचे थकीत वेतन कामगारांना अदा करण्याच्या अनुषंगाने समन्वय घडवून आणण्याकरिता उभयतांमध्ये संयुक्त बैठका घेवून तोडगा काढण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयाकडून करण्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.